# साधना

संस्थापक : साने गुरुजी

शनिवार
६ सप्टेंबर २००८
मूल्य रु. ८.००



एका महिन्यात दुसरी आवृत्ती !

# वारी एक आनंदयात्रा




संदेश भंडारे

मराठी माणसाच्या आस्थेचा
विषय असलेल्या,
वारी एक आनंदयात्रा
या छायाचित्रात्मक पुस्तकाला
दिलेल्या भरघोस प्रतिसादाबद्दल
मराठी वाचकांचं
खास अभिनंदन !

मूल्य रुपये ३५०

ऑगस्टमध्ये प्रकाशित होत आहे

चंद्रमोहन कुलकर्णी
यांचे पुस्तक

## कॉल ऑफ द सीज्

समुद्र आणि त्याची लेकरं
यांच्या
उत्कट नात्याची
संवेदनशील शब्द-चित्रे

मोठा आकार
पुठ्ठा बांधणी
आर्टपेपरवील
१०४ रंगीत पृष्ठे

मूल्य रुपये ४०० । सवलतीत रुपये ३६०
सवलत मर्यादित काळासाठी



मनोविकासचे
आणखी एक
अभिमानास्पद
प्रकाशन !

मनोविकास प्रकाशन
६७२, नारायण पेठ, पुणे ३० दूरध्वनी : ६५२६२९५०

# 'सेझ'ला वेसण घालू शकणारे मतदान

**या** देशातील एक अत्यंत महत्त्वाची निवडणूक येत्या २१ सप्टेंबरला, रायगड जिल्ह्यातील पेण तालुक्यातील २२ गावांत होत आहे. महाराष्ट्राच्या एका कोपऱ्यातल्या या छोट्या निवडणुकीचे एवढे महत्त्व काय? आणि त्या निवडणुकीचा मुद्दा काय?

महत्त्व हे की या देशातला सर्वांत मोठा भांडवलदार सर्वांत मोठा जमीनदार होण्यासाठी या निवडणुकीत उभा आहे. शासन यंत्रणा व सत्तारूढ पक्ष इमाने इतबारे त्याच्या मदतीला आहेत. तर दुसऱ्या बाजूला आहेत हातावर पोट असणारे साधेसुधे शेतकरी – एकर-दोन एकरांचे मालक. अंबानींच्या तुलनेत चक्क फाटकी माणसे! पण आज ती उभी आहेत टिच्चून पाय रोवून. लोकशाही लढतीत अंबानीला अस्मान दाखवण्यासाठी!

स्थापण्या<br>समता शांती<br>टेवुनी शुद्ध<br>**साधनां ।**<br>करिती साधना<br>त्यांना टेवो<br>उत्स्फूर्त<br>**साधना**

याबाबतची थोडी पार्श्वभूमी समजून घ्यावयास हवी. 'सेझ'चा कायदा २००५ सालचा, पण पॉलिसी २००३ सालची. ती जाहीर होताच भारतातील सर्वांत महाकाय सेझचे 'प्रकल्पपत्र' देशात सर्वप्रथम दाखल झाले ते रायगड जिल्ह्यात. या सेझसाठी १४ हजार हेक्टर जमीन हवी आहे, त्यांपैकी ११६९६ हेक्टर जमीन खाजगी मालकांकडून संपादन करावयाची आहे – उरण तालुक्यातील २० गावे, पेण तालुक्यातील २४ व पनवेल तालुक्यातील १. या सर्व गावांचे सर्व क्षेत्र या सेझला हवे आहे. साम-दाम-दंड-भेद या सर्व मार्गांचा अवलंब करूनही आतापर्यंत फक्त १३ टक्के जमीन अंबानींच्या हाताला लागली आहे. यांपैकीही बहुतेक जमीन फक्त दोनच गावांतील आहे. त्यातील एका गावातील जमीन खारफुटीने निरुपयोगी झालेली आहे. दुसरे गाव आहे महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळातील काँग्रेसच्या एका मंत्र्याचे.

पेण तालुक्यातील २२ गावांना हेटवणे धरणातील पाणी शेतीसाठी मिळावयाचे आहे, ती गावे सेझच्या क्षेत्रातून वगळावीत यासाठी मागील वर्षीच्या जुलैमध्ये 'सेझविरोधी संघर्ष समिती'ने उपोषण केले. त्यावेळी शासनातर्फे २२ गावे वगळण्याचे आश्वासन मिळाले आणि मग संघर्ष समितीने उपोषण मागे घेतले. पण शासनाने आपला शब्द तर पाळला नाहीच, उलट 'शेतकऱ्यांच्या इच्छेविरुद्ध जमिनी ताब्यात घेणार नाही' ही जपमाळ ओढत असतानाच सेक्शन ६ अंतर्गत जमीन संपादन प्रक्रियेच्या नोटीसा बजावल्या. जमिनींचा व्यवहार करण्यावर बंदी आली. वाटणी, गहाण, तारण, कर्ज पूर्णत: थांबले. शेतकरी अडचणीत आले. पण जिल्हाधिकाऱ्यांनी खास आदेश काढून अंबानींच्या बरोबर होणारा व्यवहार मात्र मान्य केला. (जणू 'अंबानींच्या सेझला जमीन विका नाहीतर भोगा आपल्या कर्माची फळे' असा अधोरेखित आदेशच.) दुसऱ्या बाजूला, सरकारने पूर्ण पलटी खाल्ली. मुख्यमंत्री म्हणाले की, हेटवणे धरणातील पाणी पिण्यासाठी दिल्यावर त्यात पाणीच शिल्लक रहात नाही, तेव्हा ही


**६ सप्टेंबर २००८**
वर्ष ६१ / अंक ४

- संपादक : **नरेंद्र दाभोलकर**
- युवा संपादक : **विनोद शिरसाट**

- हे साप्ताहिक मुद्रक, प्रकाशक नरेंद्र दाभोलकर यांनी **साथीदार प्रिंटर्स**, पुणे ३० येथे छापून, **साधना साप्ताहिक, ९२६ सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३०**, येथे प्रकाशित केले.
- दूरध्वनी : **वर्गणी, पत्ता व अंकासंबंधी, [०२०] २४४५१७२४.** संपादक : टेलिफॅक्स – २४४३२४०२.
  E-mail : ssadhana@vsnl.net • Website : www.sadhanatrust.com
- वार्षिक वर्गणी : व्यक्तिगत रु. ४००/-, संस्थांसाठी रु. ५००/- साधना मीडिया सेंटर – २४४५९६३५ / ४१.
- [अंकात व्यक्त झालेल्या सर्वच मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.]
- मुखपृष्ठ : **संदेश भंडारे** Mob. 9422309923 • रेखाचित्रे : **गिरीष सहस्रबुद्धे** Mob. 9850150488

२२ गावे सिंचन क्षेत्रातील कशी? धरण पूर्ण होऊन त्वरित पाणी मिळावे यासाठी या २२ गावांतील शेतकरी अनेक वर्षे सतत संघर्षशील होते. तरीही मुख्यमंत्र्यांचे मत असे की, शेतकऱ्यांनीही कधी पाण्याची मागणीच केलेली नाही. पण शासनाच्या पाटबंधारे खात्यानेच हेटवणे धरण, त्याचे कॅनॉल लाभकारक क्षेत्र याबाबत वेळोवेळी जे लेखी जाहीर केले त्याची रुजवातच सेझविरोधी संघर्ष समितीने घातली, त्यामुळे शासनाच्या बेजबाबदार दाव्यातील हवाच निघून गेली. सिंचनाच्या लाभक्षेत्रातील जमीन व संबंधित २२ गावांतील शेतकऱ्यांचा प्रखर विरोध यामुळे हेटवणे परिसरातील २२ गावे वगळण्याची शिफारस केंद्राकडे करण्याचे शासनाने मान्य केले. मात्र त्यापूर्वी जाहीर नोटीस देऊन त्या गावांतील शेतकऱ्यांचे म्हणणे ऐकले जाणार आहे. ती तारीख आहे २१ सप्टेंबर.

सेझचे समर्थक आता सरसावले आहेत. या सेझ समर्थकांच्या मते या सेझकरता एकरी १० लाख रुपये मिळतात. शिवाय १२.५% विकसित जमीन. ती नको असेल तर आणखी ५ लाख रोख रक्कम. एका कुटुंबात एक नोकरी, नोकरी नको असेल तर एक रकमी तीन लाख रुपयांचा निर्वाह निधी, गावठाणाच्या विकासासाठी प्रत्येकी २ कोटी. भरभरून असे फायदे मिळणार असताना विरोध कशाकरता, असा त्यांचा सवाल आहे.

'कर लो दुनिया मुठ्ठीमे' असा अंबानींना गर्व आहे. हवी ती गोष्ट कोणतीही किंमत मोजून मिळवण्याची त्यांची कार्यशैली आहे. सरकारची त्याला छुपी मदत आहे. २१ सप्टेंबरला होणारी जाहीर सुनावणी हे खरे तर सेझबद्दलचे मतदानच आहे. या गावातील प्रत्येक भूधारक शेतकरी आपले मत लेखी नोंदवणार आहे. कोणतीही हेराफेरी होऊ नये म्हणून त्यावेळी ओळखीची एक व्यक्ती व ग्रामपंचायत सदस्य हजर रहाणार आहेत. नोंदवलेल्या लेखी मताची अधिकृत एक प्रत ताबडतोब संबंधितांना मिळणार आहे. संघर्ष समितीने मतदानाची ही जी पद्धत मागितली ती मान्य करून घेतली हाही त्यांचा विजयच. हे मतदान आपण आपल्या बाजूने वळवू अशी कल्पना करून हा डाव खेळण्यास सरकारने मान्यता दिली आहे. या उलट २२ गावांतील शेतकरीबांधव प्रचंड बहुमताने सेझचा प्रस्ताव धुडकावून लावतील याची सेझविरोधी संघर्ष समितीला खात्री आहे. जमिनीची किंमत सतत वाढतच जाणार आहे, त्यामुळे आज जमीन न विकून काहीच बिघडत नाही, याची शेतकऱ्यांना जाण आहे. त्याबरोबर आजच हा भाग भरघोस पिकाचा आहे, उद्या हेटवणे धरणाचे हुकमी पाणी आल्यावर ही सुबत्ता वाढेल अशावेळी कायमस्वरूपी उपजीविकेचे साधन कोण गमावणार? तसे झाले म्हणजे सुनावणीचा कौल सेझविरोधकांच्या बाजूने गेला तर गेल्या पाच वर्षांत संपादन केलेल्या जमिनीबाबतची नुकसानभरपाई अंबानींना द्यावी लागेल, हा बागुलबुवा महाराष्ट्र शासनाकडून दाखवला जात आहे, पण तो फोल आहे. कारण संबंधित सर्व जमीन अंबानीने स्वत: विकत घेतली आहे, त्याला नुकसानभरपाई देण्याचा प्रश्न येतोच कुठे?

जागतिकीकरणाच्या आक्रमणाचे 'सेझ' हे एक ढळढळीत व दाहक रूप आहे. त्याला तोंड देण्याचा एक मार्ग नंदिग्राममध्ये दिसला, पण तो हिंसक होता. दुसरा मार्ग गोवा राज्य शासनानेच दाखवला. त्यांनी सेझ रद्द केले. तिसरा मार्ग कोर्टकचेरीचा. सेझचा कायदा व भूसंपादन प्रक्रिया या दोन्ही बाबींना मुंबई उच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले आहे. मात्र अनेक राज्यांच्या उच्च न्यायलयांत या स्वरूपाच्या याचिका दाखल झाल्या असल्याने, त्या सर्व सर्वोच्च न्यायालयात वर्ग करून एकत्रित चालवल्या जाणार आहेत. यात बराच वेळ जाईलच. या पार्श्वभूमीवर पेण तालुक्यातील २२ गावांनी शांततामय व सनदशीर मार्गाच्या तीव्र लढ्याने, लोकशाही पद्धतीने सेझला वेसण घालण्याचा एक मार्ग दाखवला आहे. म्हणूनच २१ सप्टेंबरच्या मतदानाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. त्यांना यश मिळावे यासाठी 'साधना'च्या शुभेच्छा!

■

# ओऽ बीजिंग...!

## प्रा. रा. ग. जाधव

**बीजिंगमधील चिनी क्रीडापुरुषार्थ माझ्यासारख्याला चकित करणारे एक रोमांचक रहस्य वाटते, ते वरील विचारांनीच. शंभर चिनी क्रीडावीर. शंभर प्रकारच्या खेळांतील पदकविजयी गुणवत्ता. कुठून कुठून आले असतील हे चिनी पदकवीर? त्यांपैकी कुणी खेड्यातून आला असेल, एखादा शहरातून आला असेल, एखादा शेतकऱ्याचा मुलगा असेल, कुणीएक कामगाराचा पुत्र असेल, कुणी शिक्षित असेल, तर कुणी बेताचा साक्षर असेल. त्या शंभर चिनी क्रीडापटूंचे समाजशास्त्र माहीत नाही; पण नक्कीच वाटते की, ते शतक चीनच्या बहुजिनसी, बहुवर्गीय व बहुधार्मिक समाजाचे एक प्रातिनिधिक शतक असेल. क्रीडानैपुण्य व क्रीडापुरुषार्थ हे कधीही अभिजनांचे खाते नव्हते, ती बहुजनांचीच खेती आहे, होती व असेलही!**

बीजिंगचे ऑलिंपिक क्रीडासामने...!

थोडेसे पाहिले, थोडेफार वाचले, थोड्यांकडून ऐकले आणि तरीही निखालसपणे मन थक्क झाले. पंधरवडाभर कमी-जास्त विद्युतभारित मनोवस्था, इथल्या भारनियमनाला न जुमानणारी. अभिनव बिंद्राचे सुवर्ण म्हणजे क्रीडामूल्याची प्रतिमाच! सोने कधी मला रुचले नाही आयुष्यात; पण बिंद्राचे सोनेच अभिनव. असे सोने कुणाला नाही रुचणार?

'बर्ड्स नेस्ट'- पक्ष्याचे घरटे. किती सुंदर प्रतिमा! जगभरच्या क्रीडापटूंचे, क्रीडारसिकांचे हे घरटे. त्या घरट्याच्या पहिल्या सुगरणी ग्रीक. अभिजात ग्रीक समाज व संस्कृती. ते युरोपचे घरटे एका अशियाई सुगरणीने या एकविसाव्या शतकात पहिल्यांदाच सुरेखपणे बांधले. गाजवलेही. तेही अशा पराक्रमी चोखपणाने की, अवघे जग चकित व्हावे आणि झालेही...!

पक्षी उडून गेले; पण मनाचे स्तिमित भारावलेपण उडून जात नाही, पंखही मिटत नाही. माझे घरटे सोडायला ते तयार नाही. एकदा वाटते, कविता करून मोकळे व्हावे; म्हणजे हलकेही वाटेल. पण बीजिंग, का कुणास ठाऊक, कवितेचा विषय करण्यास मन तयार होत नाही...! खेळ, क्रीडासामने, असामान्य क्रीडाकौशल्ये यांचे देदीप्यमान दर्शन पंधरवडाभर जगाला घडत होते, अंशत: मलाही! पण ते अंशमात्र दर्शन, नाही म्हटले तरी, परोक्षच. अप्रत्यक्षच. परोक्षदर्शनातून कविता उमलत नाही, नसावी. खरे तर, खेळ, क्रीडा या बाबी आमच्या भावजीवनाच्या अंतर्दालनात अजून प्रविष्टच झाल्या नाहीत. आपली घरटी अजून 'बर्ड्स नेस्ट' झालेली नाहीत. मग कविता येणारच कुठून?

कवितेकडून गद्याकडे वळले की, मग मात्र बीजिंगचे ऑलिंपिक क्रीडासामने चिनी यशोगाथेचा एक चकित करणारा अध्यायच सांगत सुटतात. धृतराष्ट्राला संजय कुरुक्षेत्रावरील युद्धपर्व सांगत होता त्याप्रमाणे... मला! चकित करणारा आणि अंतर्मुखही करणारा क्रीडाध्याय!

चीनची ऑलिंपिक- कमाई शंभर पदकांची. त्यांतली निम्मी सोन्याची व बाकी रुप्याची नि ब्राँझची. पदकांच्या यादीत चीनचा नंबर पहिला. क्रीडासामन्यांचे सुविहित नियोजन, व्यवस्थापन यांतही नंबर वन. जगभरच्या पाहुण्यांची सरबराई करण्यात, आतिथ्य करण्यातही पहिलाच क्रमांक. बीजिंगचे ऑलिंपिक ही चीनची जगाला झालेली एक अभूतपूर्व 'डिस्कव्हरी' आहे आणि खुद्द चीनलाही स्वत:च्या क्रीडानैपुण्याची व प्रबळ आत्मविश्वासाची झालेली 'डिस्कव्हरी' आहे, असे म्हणतात. या दोन्ही शोधांचा माझ्यासारख्याला लागलेला शोध हा आणखी एक तिसरा शोध.

एका रोमांचकारक रहस्यमयतेचा माझ्यापुरता असलेला हा शोधबोध होय. जागतिक पातळीवरच्या क्रीडास्पर्धेत चिनी क्रीडापटूंनी सुवर्णखचित शंभर पदके पटकविणे ही विलक्षण नवलाईची बाब आहे. क्रीडाक्षेत्रातील नैपुण्य व उच्चतम गुणवत्ता या गोष्टी पूर्णपणे स्वायत्त आहेत, स्वयंसापेक्ष आहेत. बेरीज-वजाबाकीची गणिते मांडून किंवा सांख्यिकीय हेराफेरी करून क्रीडा, क्रीडापटू व क्रीडापदके हासील करता येत नाहीत. क्रीडापुरुष व क्रीडापुरुषार्थ येनकेनप्रकारे घडवता येत नाहीत, 'मॅनिप्युलेट' करता येत नाहीत. हे खरे ना?

दुसरी गोष्ट म्हणजे, मी मला किंवा माझ्या बांधवांना क्रीडाक्षेत्रातील 'तारे' म्हणून मानले किंवा गौरविले, तरी विशेषत: ऑलिंपिकसारख्या जागतिक स्पर्धेत त्यांनी खरोखरच ताऱ्यांप्रमाणे चमकणे अपेक्षित असते; नपेक्षा 'तारे जमींपर' हे भागधेय टाळता येत नाही. मला व माझ्याच केवळ देशाला नव्हे, तर जगातील कुणालाही व कोणत्याही देशाला.

बीजिंगमधील चिनी क्रीडापुरुषार्थ माझ्यासारख्याला चकित करणारे रोमांचक रहस्य वाटतो, तो वरील विचारांनीच. शंभर चिनी क्रीडावीर. शंभर प्रकारच्या खेळांतील पदकविजयी गुणवत्ता. कुठून कुठून आले असतील हे चिनी पदकवीर? त्यांपैकी कुणी खेड्यातून आला असेल, एखादा शहरातून आला असेल, एखादा शेतकऱ्याचा मुलगा असेल, कुणीएक कामगाराचा पुत्र असेल, कुणी शिक्षित असेल, तर कुणी बेताचा साक्षर असेल. शंभर चिनी क्रीडापटूंचे

समाजशास्त्र माहीत नाही; पण नक्कीच वाटते की, ते शतक चीनच्या बहुजिनसी, बहुवर्गीय व बहुधर्मीय समाजाचे एक प्रातिनिधिक शतक असेल. क्रीडानैपुण्य व क्रीडापुरुषार्थ हे कधीही अभिजनांचे खाते नव्हते, ती बहुजनांचीच खेती आहे, होती व असेलही!

त्या विविध क्रीडापुरुषार्थींना घडविले कुणी? आणि घडविले कसे? केव्हा? हे नियोजन व व्यवस्थापन कुणी केले? कसे? या प्रश्नांची उत्तरे माझ्यासारख्याला देताच येणार नाहीत. पण ती उत्तरे कुणीतरी माझ्यासारख्यांसाठी दिली पाहिजेत. 'ऑलिंपिक क्रीडाविजेत्यांचे शतक' ही सामान्य गोष्ट नाही, हे आपण फार गंभीरतेने समजून घेतले पाहिजे. खरे तर, या मनुष्यसंस्कृतीत खऱ्याखुऱ्या मंगल जागतिकीकरणाचे पहिले बीज ग्रीकांच्या ऑलिंपियाडनेच पहिल्यांदा पेरले. तिथेच. त्या बीजाला चिनी पराक्रमाचे गोमटे फळ एकविसाव्या शतकात यावे, ही विलक्षण थरारक व अर्थपूर्ण बाब आहे. ऑलिंपिक म्हणजे जागतिकीकरण म्हणजे जागतिक सुसंवाद, सुस्पर्धा, सुंदर पुरुषार्थ...! आणि चीन त्यात अग्रगामी हे बीजिंग ऑलिंपिकने सिद्ध करावे, ही बाब किती किती अर्थपूर्ण, सूचक! चीनचा मला लागलेला तिसरा शोध हा असा.

एक सर्वसामान्य माणूस म्हणून मला माहीत आहे की, चीन ही विद्यमान जगातील एक राजकीय महासत्ता आहे. विद्यमान जगात महासत्ता ठरण्यासाठी ज्या ज्या गोष्टी लागतात, त्या त्या सर्व गोष्टी चीनजवळ मौजूद आहेत. धनसत्ता, ज्ञानसत्ता, शस्त्रास्त्रसत्ता, आर्थिक सत्ता, मनुष्यबळाची सत्ता, महत्त्वाकांक्षेची युयुत्सू सत्ता, कर्मसत्ता, तंत्रविज्ञानसत्ता. सगळ्या मनुष्याधीन सत्तांचे संकुल म्हणजे चीन. माझ्यासारख्याला हेही माहीत आहे की, चिनी संस्कृती ही भारतीय संस्कृतीसारखीच एक फार पुरातन संस्कृती आहे आणि ती खूप विशाल, गुंतागुंतीचीही आहे. तिलाही परंपरेचे जीवघेणे पाश आहेत. सांस्कृतिक अनुशेषांचे प्रचंड ताण आहेत, भारतासारखेच! प्राचीन काळातील भारत-चीन-संबंध हेही सर्वपरिचित आहेत. भारत-चीन सांस्कृतिक आंतरक्रिया हीदेखील खूपशी माहीत आहे. आणि कालचे-आजचे दुखते-खुपते संबंधही ठाऊक आहेत.

मनुष्याधीन असलेली महासत्तेची सर्व रूपे व साधने विद्यमान चीनजवळ आहेत. पण चीनची क्रीडासत्ता यांपैकी कोणतीही सत्ता वा साधन निर्माण करू शकत नाही. यांपैकी कोणतीही सत्ता क्रीडापुरुषार्थ 'मॅनिप्युलेट' करू शकत नाही. राजकीय चिनी महासत्ता ऑलिंपिक क्रीडापटूंना जन्म देऊ शकत नाही. त्यासाठी क्रीडाखेळांचीच जन्मदाती कूस आवश्यक असते. पक्षीय हुकूमशाही असलेल्या आणि बहुपक्षीय लोकशाही असलेल्या अशा दोन्ही प्रकारच्या देशातून घडलेल्या क्रीडापटूंनी बीजिंग ऑलिंपिक क्रीडासामन्यात पहिले दोन क्रमांक पटकावलेले आहेत. याचा अर्थ क्रीडासंस्कृतीची जडणघडण ही वेगळ्या रसायनाची प्रक्रिया आहे.

मनात येते, क्रीडासंस्कृती ही अखेर एका विशुद्ध इहवादाचा आविष्कार आहे. माणूस, त्याचे जग, त्याच्या शारीर व मानसिक क्षमता, त्याचे कर्तृत्व हा इहवादाचा गाभा आहे. धर्म, अध्यात्म इत्यादींना त्यात महत्त्व नाही. आपली परंपरा, आपले प्रेम, आपली आवड आजही प्राधान्याने धार्मिक, आध्यात्मिक आहे; ऐहिकतावादी नाही. मला नवल वाटते ते याचे की, आपल्या महान अध्यात्मवादी संस्कृतीने ग्रीकांप्रमाणे एखादे जागतिक आध्यात्मिक ऑलिंपियाड का बरे सुरू केले नाही? तसे झाले असते, तर आपल्या अध्यात्मज्ञानाची गुणवत्ता कितपत आहे, याचा जागतिक स्पर्धेत निवाडा झाला असता.




अर्थात अध्यात्माची स्पर्धा आणि क्रीडास्पर्धा यांत फरक आहे. अध्यात्म ही व्यक्तिनिष्ठ कोटी आहे, तर क्रीडा ही वस्तुनिष्ठ कोटी आहे. स्पर्धा वस्तुनिष्ठ कोटींतील- गोष्टींबाबत होऊ शकतात; पण व्यक्तिनिष्ठ कोटीतील गोष्टींबाबत होऊ शकत नाहीत. भारतीय संस्कृतीत कसल्याच स्पर्धेचा अवकाशच उपलब्ध नाही, नव्हता!

धर्म व अध्यात्म स्पर्धानिरपेक्ष, स्पर्धाशून्य आहेत, म्हणून त्यात मानवी क्षमतांची व गुणवत्तेची स्पर्धा होऊच शकत नाही. त्यांचा कसही लागत नाही. पुन्हा धर्म व अध्यात्म म्हणजे श्रद्धाविषय. श्रद्धा ह्या एकूणएक स्पर्धा नाकारणाऱ्या हुकूमशहाच असतात.

अशी स्पर्धाशून्य परंपरा कवटाळून बसलेल्या आपल्या देशाला ऑलिंपिक क्रीडासामन्यांतील पदकप्राप्तीची शंभरी केव्हा गाठता येईल? सांगणे कठीण आहे; पण आमचे महान ज्योतिषी या बाबतीतही कुंडली मांडून भविष्यकथन करतीलच. आपली स्पर्धाशीलता ग्रह-ताऱ्यांच्या गतीत गुंतलेली! माणसाच्या गतिमान निपुणतेशी तिचे सोयरसुतक नाही.

- प्रश्न भविष्यकथनाचा नाही; तो आहे क्रीडासंस्कृतीच्या संगोपन-संवर्धनाचा! कलावंत जन्मावा लागतो म्हणतात, मग क्रीडावंतांचे काय? वाटते, क्रीडावंतही जन्मावा लागतो व कलावंतांप्रमाणेच घडावाही लागतो. क्रीडावंताचे जन्मणे आणि घडणे यांमध्ये समाज-संस्कृतीचा भक्कम पूल असावा लागतो, उड्डाणपूलच! तो पूल इथे आहे कुठे?

**रा. ग. जाधव**

अमेय अपार्टमेंट, २१२ शनिवार पेठ,
पुणे ४११०३०.
मोबा. : 9422344668

# मुशर्रफ यांच्यानंतरचा पाकिस्तान

डॉ. अशोक चौसाळकर

**आसिफ अली झरदारी व नवाझ शरीफ यांच्यासमोर लोकशाही राजवट कार्यक्षमरित्या चावलण्यासाठी जी राजकीय इच्छाशक्ती लागते ती नाही. लोकशाहीचे अनुशासन नाही. त्यामुळे त्यांच्यात संघर्ष सुरू राहणार. राजकीय अस्थिरता निर्माण होणार. बलुचिस्तानसारखे प्रश्न सोडवणे महत्त्वाचे आहे. याकडे दुर्लक्ष केले जाईल म्हणून लोकशाही राजवट व्यवस्थित चालवण्याची जबाबदारी या दोन नेत्यांची आहे. नाहीतर दोन-तीन वर्षांच्या गोंधळानंतर सत्ता पुन्हा सैन्याच्या ताब्यात जाण्याची शक्यता आहे. गेली नऊ वर्षे स्थिरता प्रदान करून पाकिस्तानला विकासाचा मार्ग दाखवला हे मुशर्रफ यांचे योगदान आहे तर तालिबानसारखे भस्मासूर निर्माण करून दक्षिण आशियात संघर्ष निर्माण केला ही त्यांची मोठी चूक ठरली.**

पाकिस्तानचे राष्ट्रपती जनरल मुशर्रफ यांनी आपल्या पदाचा अखेर राजीनामा दिला. गेल्या काही दिवसापासून त्यांचा हा राजीनामा अपेक्षित होता, कारण गेल्या वर्षभरापासून त्यांचे राजकारणातील डावपेच चुकत होते. आता पाकिस्तानच्या सैन्याचा आपणास पुरेसा पाठिंबा मिळणार नाही हे लक्षात आल्यानंतर मुशर्रफ यांनी राजीनामा दिला. यापूर्वी जनरल इस्कंदर मिर्जा, जनरल आयुब खान आणि जनरल याह्याखान यांनाही अशाच परिस्थितीमध्ये आपल्या पदाचे राजीनामे द्यावे लागले होते. अगदी लष्करी हुकूमशहादेखील फार दिवस लोकमताच्या विरोधात सत्तेवर राहू शकत नाहीत.

परवेझ मुशर्रफ हे वेगळ्या प्रकारचे राजकारणी होते, कारण त्यांच्याजवळ नवे राजकीय प्रयोग करण्याची ताकद होती. पाकिस्तानी सत्ताधाऱ्यांपेक्षा एका वेगळ्या पार्श्वभूमीतून ते आले होते. स्वातंत्र्यानंतरचे बहुतेक पाकिस्तानी राज्यकर्ते हे पंजाब, सिंध प्रांतातून आलेले होते. त्यातील काहीजण पठाण होते. पण मुशर्रफ मोहाजीर होते. भारतातील निर्वासित म्हणून गेलेल्या मुसलमानांतून ते आलेले होते आणि या मुसलमानांचे पंजाब व सिंध प्रांतातील नेत्यांशी जमत नाही. त्यामुळे मोहाजीर कौमी मूव्हमेंट नावाची हिंसक चळवळ तेथे चालवली जाते आहे. या पार्श्वभूमीवर मुशर्रफ जवळजवळ नऊ वर्षे पाकिस्तानात सत्तेवर राहिले. मुशर्रफ यांचा वारसा कोणता आहे? मुशर्रफ यांच्यानंतर पाकिस्तानचे राजकारण कोणते वळण घेईल?

पाकिस्तानच्या इतिहासामध्ये १९४७ ते १९५८ या काळामध्ये कमजोर आणि आपापसात भांडणाऱ्या राजकीय पुढाऱ्यांची सरकारे होती. त्यावर वरचष्मा सनदी अधिकारी आणि लष्कराचा होता. १९५८ ते ७२ या काळामध्ये तेथे लष्कराचे राज्य होते. १९७२-७७ या काळामध्ये श्री.झुल्फिकार अली भुट्टो यांची सत्ता होती. १९७७-८८ या काळात जनरल झिया उल-हक यांची सत्ता होती. १९८८-९९ या काळामध्ये नवाझ शरीफ आणि बेनझीर भुट्टो हे आलटून-पालटून पंतप्रधान झाले, पण खरी सत्ता लष्कराच्या हातामध्ये होती. १९९९ साली नवाझ शरीफ यांना पदच्युत करून परवेझ मुशर्रफ यांनी सत्ता हाती घेतली आणि नऊ वर्षानंतर त्यांना आपल्या पदाचा त्याग करावा लागला. पाकिस्तानच्या इतिहासामध्ये लोकशाहीच्या विकासाला फार कमी अवकाश मिळाला.

जनरल मुशर्रफ यांना जनरल झिया-उल-हक यांच्यापासून तीन वारसे मिळाले होते.

१. अफगाणिस्तानमध्ये हस्तक्षेप करीत तेथे आपल्या पसंतीचे सरकार आणणे व त्यासाठी अमेरिकेला पाठिंबा देणे.
२. पाकिस्तामध्ये इस्लामी दहशतवाद्यांना आश्रय देणे.
३. या दशहतवाद्यांच्या मदतीने भारताच्या विरुद्ध आक्रमक धोरण स्वीकारणे. आणि काश्मीरप्रकरणी भारताची कोंडी करणे.

पाकिस्तानचे तत्कालीन पंतप्रधान नवाझ शरीफ यांनासुद्धा हाच कार्यक्रम राबवावा लागला.

पाकिस्तानचे लष्कर आणि 'आयएसआय' यांनी या तिन्ही आघाड्यांवर मुशर्रफ यांच्या कारकिर्दीत काही प्रमाणात यश मिळविले. रशियन सैन्याने अफगाणिस्तानमधून माघार घेतल्यानंतर तेथे काही दिवस परस्परसंघर्ष झाला, परंतु नंतर पाकिस्तान सैन्याने तयार केलेले तालिबानचे सैन्य अफगाणिस्तानमध्येच घुसले आणि अफगाणिस्तानवर आपला कब्जा प्रस्थापित केला. भारताविरुद्धच्या उद्याच्या लढाईमध्ये स्ट्रॅटेजिक डेप्थ हवी म्हणून अफगाणिस्तानचा वापर करण्याचा पाकिस्तानचा हेतू होता. त्यामुळे अफगाणिस्तान आणि पाकिस्तानच्या सीमेवरील सरहद्द प्रांतामध्ये जगभरचे मुसलमान अतिरेकी आणि दहशतवादी जमा झाले. अफू, गांजा आणि इतर मादक द्रव्ये व शस्त्रास्त्रे खुल्या बाजारामध्ये विकले जाऊ लागले. पाकिस्तान सरकारचे अस्तित्व या भागात नावापुरते राहिले, परंतु या दहशतवाद्यांवर पाकिस्तानचे सैन्य आणि आयएसआय यांचे नियंत्रण होते. अमेरिकेचाही त्याला विरोध नव्हता. मुशर्रफ यांनी सत्तेवर येण्यापूर्वीच कारगिल भागामध्ये घुसखोरी करून महत्त्वाची शिखरे ताब्यात घेतली होती.

जम्मू-श्रीनगर-लेह मार्ग धोक्यात आणण्याचा त्यांचा प्रयत्न होता. मुशर्रफ यांचा प्रयत्न यशस्वी झाला नाही, कारण भारतीय सैन्याने प्रतिकार सुरू केला. भारतीय सैन्य पाकिस्तान अधिकृत काश्मीरमध्ये घुसण्याची शक्यता निर्माण झाली, त्यामुळे अमेरिकेने हस्तक्षेप करून पाकिस्तानला सैन्य माघारी घेण्यास भाग पाडले. त्यानंतर दोन-तीन महिन्यातच मुशर्रफ यांनी सत्ता ताब्यात घेतली.

पाकिस्तानी सेना आणि आयएसआय यांनी परकीय दहशतवादी पाकिस्तानातील काश्मिरी दहशतवादी आणि काश्मिरी दहशतवादी यांच्या सहाय्याने मोठ्या प्रमाणात दहशतवादी कारवाया केल्या. १९९०-९१ नंतर शहरी भागात राहणाऱ्या काश्मिरींनी मोठ्या प्रमाणात उठाव केला, तो उठाव भारतीय सरकारने दडपून टाकला. परंतु दहशतवादी कारवाया होत राहिल्या आणि या कारवायांना पाकिस्तानचा पाठिंबा होता. या काळात मुल्ला, मिलिटरी आणि मिलिटंट या तिघांची आघाडी होती. भारताच्या विमानाचे अफगाणिस्तानमध्ये अपहरण करून काही दहशतवादी कैद्यांना सोडण्यास दहशतवाद्यांनी भारत सरकारला भाग पाडले, याच काळात  अफगाणिस्तानात अल-कायदाचे नेते, मुल्ला उमर बिन लादेन आणि जवाहिरी यांना आश्रय देण्यात आला. भारताच्या दृष्टीने हा मोठा कसोटीचा काळ होता.

११ सप्टेंबर २००१ रोजी अल-कायदाच्या दहशतवाद्यांनी अमेरिकेच्या वर्ल्ड ट्रेड-सेंटरवर विमान धडकवून ते नष्ट केले व त्यात हजारो लोक मारले गेले. अल-कायदाच्या दहशतवादाविरुद्ध अमेरिकेने हत्यार उचलले. अमेरिकन सैन्याने अफगाणिस्तानात प्रवेश करून तालिबानचा पराभव केला आणि तिचे स्वत:चे हस्तक सरकार आणले. मुशर्रफ यांच्यापुढे नवा प्रश्न निर्माण झाला. दहशतवादाविरुद्धच्या युद्धात अमेरिकेला पाठिंबा द्यायचा की, जुने धोरण कायम ठेवून दहशतवाद्यांना आश्रय द्यायचा? अमेरिकेच्याविरुद्ध जाण्यामध्ये पाकिस्तानला मोठा धोका आहे. अमेरिकेचे सैन्य तालिबानला नष्ट करण्यासाठी सरहद्द प्रांतात घुसू शकते हे लक्षात घेऊन मुशर्रफ यांनी अमेरिकेला पाठिंबा दिला. त्याच काळात दहशतवाद्यांनी भारतीय संसदेवर हल्ला केला, त्यामधून या दोन देशात युद्ध होते की काय अशी परिस्थिती निर्माण झाली.

यानंतरच्या सहा-सात वर्षांत मुशर्रफ यांनी आपले राजकीय धोरण बदलले, त्यासाठी त्यांनी पाच महत्त्वाच्या गोष्टी केल्या.

१. पाकिस्तानच्या राजकारणावर असलेले मुसलमान मुल्ला-मौलवीचे वर्चस्व कमी करून सुधारणावादी कार्यक्रम अंमलात आणण्याचे ठरवले. आपण पाकिस्तानचे केमालपाशा आहोत असे ते म्हणत होते, त्या दृष्टीने काही सुधारणा केल्या. स्त्रियांचे अधिकार आणि नागरी स्वातंत्र्य याबाबतीत त्यांची भूमिका उदार होती.

२. पाकिस्तानमध्ये आर्थिक सुधारणा घडवून आणल्या, कारण मधल्या काळामध्ये पाकिस्तानची आर्थिक परिस्थिती वाईट झालेली होती. देश कर्जबाजारी झाला होता. त्यामुळे आर्थिक सुधारणांवर भर दिला, परकीय गुंतवणूक वाढवली. त्यामुळे २००३-०४ नंतर पाकिस्तानची अर्थव्यवस्था ५ ते ६ टक्के दराने विकसित होत आहे.

३. मुशर्रफ यांनी काश्मीरच्या दहशतवाद्यांना आणि इस्लामी दहशतवाद्यांना पाठिंबा दिला. अमेरिकेच्या दडपणामुळे हा पाठिंबा त्यांना कमी करावा लागला. भारताचे त्या वेळचे पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांनी त्यांना आग्रा शिखर परिषदेचे निमंत्रण दिले. ही शिखर परिषद यशस्वी झाली नाही, तरीही भारत आणि पाकिस्तानातील लोक संघर्षाच्या व वैमनस्याच्या राजकारणाला कंटाळलेले आहेत याची जाणीव त्यांना झाली, त्यामुळे नव्या डावपेचांना त्यांनी सुरवात केली.

४. मधल्या काळामध्ये भारतीय सेनेने काश्मीरवर वर्चस्व स्थापन केले. तेथे निवडणुका झाल्या, नवी सरकारे सत्तेवर आली. त्यामुळे पुन्हा जुने धोरण कसे राबवायचे हा प्रश्न निर्माण झाला.




*'रोम जळत होते तेव्हा सम्राट निरो बिगूल वाजवण्यात दंग झाला होता' या ऐतिहासिक घटनेची आठवण करून देणारे हे व्यंगचित्र...*

५. भारत-पाकिस्तान संबंधामध्ये मुशर्रफ यांनी क्रांतिकारक बदल घडवून आणले. काश्मीरबाबत पाकिस्तानची अशी भूमिका होती की, काश्मीरबाबतचा अंतिम निर्णय संयुक्त राष्ट्राच्या ठरावाप्रमाणे व्हावा आणि काश्मिरी जनतेला स्वयंनिर्णयाचा अधिकाराचा निर्णय प्राप्त व्हावा. मुशर्रफ यांनी याबाबतचा आग्रह सोडला आणि काही नवे प्रस्ताव मांडले. काश्मीरच्या सीमा खुल्या करून 'जैसे थे' परिस्थिती कायम ठेवत दोन्ही भागांना व्यापक स्वायत्तता द्यावी, भारत-पाकिस्तानमधील प्रत्यक्ष ताबारेषा खुली करावी व व्यापारास प्रोत्साहन द्यावे असे त्यांचे प्रस्ताव होते. या प्रस्तावांमुळे भारत-पाकिस्तानातील संघर्षाचे वातावरण बरेचसे निवळले. या काळात मुशर्रफ दहशतवाद्यांना चुचकारत होते. त्यांच्यावर नियंत्रणही आणत होते. पण भारत सरकारकडून फारसा प्रतिसाद न मिळाल्यामुळे मुशर्रफ यांना याबाबत मोठे यश मिळवता आले नाही. कारण भारत सरकारला या सर्व प्रस्तावात त्यांची विश्वासार्हता दिसत नव्हती. पण आज काश्मिरात पुन्हा विभाजनवाद्यांनी उठाव केल्यामुळे मुशर्रफ यांनी स्वयंनिर्णयाचा आग्रह सोडून पाकिस्तानचे नुकसान केले असे तेथील मुत्सद्दी म्हणत आहेत.

मुशर्रफ यांनी नऊ वर्षे चलाखीने राज्य करताना अनेक दहशतवादी हल्ले पचवले. पण त्यांच्या हे लक्षात आले की बलुचिस्तान व सरहद्द प्रांतावरची केंद्राची पकड ढिली होत आहे. त्यामुळे त्यांनी बलुचिस्तानमध्ये सैन्य पाठवले. सरहद्द प्रांतात त्यांनी दहशतवाद्यांशी करार केले, पण ते टिकले नाहीत.

डिसेंबरमध्ये २००७ मध्ये बेनझीर भुट्टो यांची हत्या झाली आणि त्यांच्यात व मुशर्रफ यांच्यात जो करार होता, तो धोक्यात आला. फेब्रुवारी २००८ च्या निवडणुकीत पीपीपी व मुस्लिम लीगचा विजय झाला. त्याचवेळी मुशर्रफ यांनी राजीनामा दिला असता तर बरे झाले असते. पाकिस्तानी सेना आपणास पाठिंबा देत नाही असे त्यांच्या लक्षात आले त्यावेळी त्यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला. सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांना काढणे, निवडणुकीपूर्वी जुन्याच विधिमंडळाकडून स्वत:स निवडून आणणे, लोकांची मुस्कटदाबी करणे यामुळे मुशर्रफ यांची अधिमान्यता कमी होत होती. म्हणून महाभियोगाचा खटला सुरू होण्यापूर्वी त्यांनी राजीनामा दिला. त्यामुळे पाकिस्तानात अस्थिरता निर्माण झाली नाही.

मुशर्रफ यांच्यानंतरचे राज्यकर्ते हे कमजोर राज्यकर्ते असतील, कारण झरदारी आणि नवाझ शरीफ यांच्यातील सत्ता-संघर्षास सुरुवात झाली आहे. त्या उभयतांकडून राज्य कारभार चांगला चालेल असे म्हणता येणार नाही. त्यामुळे लोकसभेसाठी वर्षभरात पुन्हा निवडणुका होऊ शकतात. अमेरिकेशी मैत्री, नवे आर्थिक धोरण व आर्थिक सुधारणा, सौदी अरेबियाशी स्नेहसंबंध या गोष्टी चालू राहतील.

मात्र महत्त्वाच्या प्रश्नावर सरकार निर्णय घेणार नाही. संरक्षण, युद्धसज्जता, अण्वस्त्रे व परराष्ट्रधोरण याबाबत अंतिम निर्णय सैन्याकडे राहील. त्यात बदल होणार नाही. कारण सैन्य आणि अमेरिका यांचे जवळचे संबंध आहेत. जम्मू-काश्मिरबाबत मुशर्रफ यांचे धोरण पुढे चालू ठेवले जाणार नाही. काश्मीरमध्ये जर अशांतता कायम राहिली, निवडणुका नीट झाल्या नाहीत तर भारतावर दबाव टाकण्यासाठी ताबारेषेवर सातत्याने गोळीबार करणे, भारतात दहशतवादी घुसवणे, त्यांना आर्थिक मदत देणे हे प्रकार मोठ्या प्रमाणात सुरू होतील. नागरी सरकार मैत्रीच्या गोष्टी बोलत राहील, आर्थिक बाबतीत काही नवी पावलेही उचलली जातील, पण मूलभूत प्रश्नांचे निराकरण होणार नाही. ती शक्यताही मुशर्रफ-वाजपेयी यांच्या काळात जास्त होती, कारण दोघांचीही 'आऊट ऑफ बॉक्स' मार्ग काढता येईल का याबाबत चाचपणी चालू होती. सिंग-मुखर्जी यांना त्यात रस नव्हता.

पाकिस्तानमध्ये तीन प्रांतात सध्याच्या सरकारला पाठिंबा देणारी सरकारे आहेत. सरहद्द प्रांतातील परिस्थिती वाईट आहे. कारण ग्रामीण-डोंगराळ आदिवासी भागात सरकारचा प्रभाव नाही. त्यातील काही भाग तालिबानच्या ताब्यात आहे. जसजसा अमेरिका व तालिबान यांच्यातील संघर्ष तीव्र होईल, तसतसा त्या संघर्षाचा त्रास पाकिस्तानला भोगावा लागेल. कदाचित त्या भागात अमेरिका व नाटो यांचे सैन्य घुसेल, कारण अफगाणिस्तान ही आता पाकिस्तानची मोठी डोकेदुखी आहे. सध्याचे करझाई सरकार विरोधात आहे तर तालिबानचा त्या भागात धुमाकूळ चालू आहे. तालिबान व त्यांनी पैदा केलेले दहशतवादी पाकिस्तानला अत्यंत अडचणीत टाकणार आहेत. आज त्या भागात दहशतवादी कारवाया सुरू असून त्यात शेकडो माणसांचा बळी गेला आहे. जसजसा अमेरिकेचा दबाव वाढत जाईल, तसतसा दहशतवादी कारवायांचा जोर वाढत जाईल, कारण पाकिस्तानी सैन्यात पण दहशतवाद्यांना पाठिंबा देणारे लोक आहेत.

आसिफ अली झरदारी व नवाझ शरीफ यांच्यासमोर सुधारणांची कार्यक्रम पत्रिका नाही. लोकशाही राजवट कार्यक्षमरित्या चालवण्यासाठी जी राजकीय इच्छाशक्ती लागते ती नाही. लोकशाहीचे अनुशासन नाही. त्यामुळे त्यांच्यात संघर्ष सुरू राहणार. राजकीय अस्थिरता निर्माण होणार. बलुचिस्तानसारखे प्रश्न सोडवणे महत्त्वाचे आहे. याकडे दुर्लक्ष केले जाईल म्हणून लोकशाही राजवट व्यवस्थित चालवण्याची जबाबदारी या दोन नेत्यांची आहे. नाहीतर दोन-तीन वर्षांच्या गोंधळानंतर सत्ता पुन्हा सैन्याच्या ताब्यात जाण्याची शक्यता आहे. गेली नऊ वर्षे स्थिरता प्रदान करून पाकिस्तानला विकासाचा मार्ग दाखवला हे मुशर्रफ यांचे योग्यदान आहे तर तालिबानसारखे भस्मासूर निर्माण करून दक्षिण आशियात संघर्ष निर्माण केला ही त्यांची मोठी चूक ठरली.

**डॉ. अशोक चौसाळकर**

४१६ आर.के.नगर, हौसिंग सोसायटी नं. ६, पाचगाव,
कोल्हापूर ६१६०१३,
भ्रमणध्वनी : 9923071421

व्यासपीठ

रजिया पटेल

२

**देशभरातून अभिनंदन आणि समर्थन करणारी जी पत्रे आली त्यात जास्तीत जास्त पत्रे मुस्लिम तरुण-तरुणींची होती. अगदी काश्मीरच्या युवकांची पत्रेही त्यात होती, मात्र सिनेमाबंदी आंदोलनानंतर दशहतही खूप वाढली. मी कोणाची मुलगी वगैरेंचा शोध पंचकमिटीच्या लोकांनी घ्यायचा प्रयत्न केला. शिवाय संघर्षवाहिनीच्या कार्यालयावर रात्रीच्या वेळी दगडफेक केली गेली. प्रचंड दहशत आणि धमक्या यांमुळे सर्वसामान्य मुस्लिम महिलांवरही दडपण आले. मला सरकारने पोलिस संरक्षण दिले. त्यातून मी लवकरच सुटका करून घेतली. मात्र मुस्लिम महिलांमध्ये काम करण्याबाबत माझ्या मनातील विचारचक्र त्यानंतर वेगाने फिरू लागले...**

# छात्रयुवा संघर्षवाहिनीतील माझी वाटचाल

जेव्हा असं लक्षात आलं की ही एक अशी व्यवस्था आहे जी तुम्हाला संपूर्णपणे वाकवू पाहते, तेव्हा खूप असहाय्य वाटलं, अगदी अगतिक झाल्यासारखं. तरीही शेवटी हा प्रश्न मनात उसळून येतच होता की का म्हणून दडपणात जगायचं? का म्हणून अन्याय सहन करायचा? या विरोधात लढलं पाहिजे.

आणि त्यातून मला सर्वप्रथम मार्ग दिसला तो साधनाच्या व्यासपीठाचा ज्याचे संपादक यदुनाथजी होते. मी साधनात लिहिलं, त्यानंतर यदुनाथजींनी माझ्या वडिलांनाही लिहिलं...

मुलींच्याबद्दल एकूणच स्त्रियांच्याबद्दल, कुटुंबाच्या, समाजाच्या काही धारणा असतात, (मुलींनी कसं रहावं, वागावं, बोलावं, मर्यादेत असावं वगैरे) पण या परंपरा आणि धारणांना माझ्या 'का'ने आणि नंतर कृतीने धक्के दिले. जळगाव जिल्ह्यातील पाचोरा तालुक्यात आमच्याच समाजातील खलील देशमुख हा तरुण चळवळीशी संबंधित होता, राष्ट्र सेवादलाचं काम करीत होता. त्याने एक मराठी वृत्तपत्र काढलं, त्याचे अंक आमच्या समाजातील बहुतेकांकडे पोचले. तो पेपर आमच्याकडे आला तेव्हा मी 'मुस्लिम समाजात प्रबोधनासाठी हे आवश्यक आहे' असं काहीसं पत्र लिहून त्याचं अभिनंदन केलं आणि ते पत्र त्या वृत्तपत्रात छापून आलं. त्याबाबतही 'कोणी सांगितला होता हा शहाणपणा?' अशी प्रतिक्रिया घरातून आली. खलील देशमुखने त्यावेळी स्वातंत्र्य सैनिकांच्या काही प्रश्नांवर उपोषण केलं आणि त्याला पाठिंबा म्हणून येण्याचं पत्र मलाही पाठवलं. पाचोरा जळगावपासून पाऊण तासाच्या अंतरावरील त्या कार्यक्रमाला मी गेले. तिथे छात्रयुवा संघर्षवाहिनीचे शेखर सोनाळकर, शुभा शमीम आलेले होते. आदिवासी भागात काम करणाऱ्या संघर्ष वाहिनीच्या भीमराव म्हस्के यांचा लेख साधनातील 'समतासंगर' या सदरात मी वाचला होता. त्यामुळे संघर्षवाहिनी हे नाव आणि त्यांचे काम हे ओळखीचं होतं. पण शेखर आणि शुभा शमीमसोबत मी संघर्षवाहिनीच्या कार्यालयात गेले (ते जळगाव इथे शेखर सोनाळकरांच्या घरात होतं). जळगाव ते पाचोरा ते संघर्ष वाहिनीचं कार्यालय हा अवघा अर्धा दिवसाचा 'माझा प्रवास' भयंकर कठीण होता. कारण एक उलथापालथ घडवणारी गोष्ट मी करीत होते, ज्याची माझे कुटुंबीय कल्पनाही करू शकत नव्हते. मला स्वत:लाही हा टप्पा मानसिक संघर्षाचाच होता. पण संघर्षवाहिनीच्या साथींना भेटल्यावर वाटले, आपण अगदीच एकटे नाही आहोत. हे आपल्यासारखेच, आपल्याच वयाचे लोक आहेत आणि आपल्याला एकेकट्याने लढता नाही येणार. हे लढताहेत तेही कुठल्या ना कुठल्या अन्यायाच्या विरोधातच. मग मी त्या लढ्याचा भाग झाले पाहिजे, हा माझा निश्चय पक्का झाला. त्यानंतर सर्व प्रकारच्या दडपणातून मी निसटले आणि छात्रयुवा संघर्षवाहिनीची सैनिक बनले. आज सहजपणे मी हे लिहिते आहे, पण यासाठी मी आणि माझ्या संघर्षवाहिनीच्या साथींनी कितीतरी अधिक धोका बेधडकपणे पेलला होता. त्या काळात जळगाव जिल्हा संघर्षवाहिनीचे जे साथी होते त्यात रमेश बोरोले, राजेंद्र मानव, कुंजबिहारी, दिलीप सुरवाडे, नितीन तळेले, प्रकाश, नरेंद्र काबरा, नंतर जोडले गेलेले शैला सावंत, सुधाकर बडगुजर, हेमराज बारी अशी वेगवेगळ्या सामाजिक स्तरांमधून आलेली तरुण मुलं तर होतीच, पण वेगवेगळ्या स्तरातून आलेल्या मुलीदेखील होत्या. वासंती दिघे, रत्ना रोकडे, अरुणा तिवारी आणि त्यांच्या सोबत महाविद्यालयात शिकणाऱ्या कितीतरी मुली.

छात्रयुवा संघर्षवाहिनीच्या जळगाव येथील प्रांतीय कार्यालयात मी दाखल झाले. नंतर मालेगाव येथील युवक शिबिरात गेले. त्यानंतर माझी रवानगी यदुनाथजींकडे पुण्याला झाली. तिथे मी वर्षभर राहिले. यदुनाथजींनी माझी जबाबदारी घ्यायचा निर्णय घेतला होता, पण खऱ्या अर्थाने घरात माई (जान्हवी थत्ते) यांनी माझी जबाबदारी घेतली. परक्या घरातल्या, शिवाय परधर्मीय तरुण मुलीची जबाबदारी घेणं ही काही सोपी गोष्ट नव्हे. पण माझ्या कुटुंबात माझ्या वडिलांचा आणि यदुनाथजींच्या कुटुंबाचा परस्परांवरील विश्वास ही अतिशय मौलिक गोष्ट यात होती. सामाजिक परिवर्तन आणि

मानवी मूल्ये या विचारसरणीतून निर्माण झालेला हा विश्वास होता.
यदुनाथजींसोबत मी साधनाच्या कार्यालयात जायचे. मी काही मालिकांमध्ये, वर्तमानपत्रांमध्ये लिहायला लागले ती यदुनाथजींच्या मार्गदर्शनाखाली. साधना साप्ताहिकात तेव्हा जयदेव डोळे आणि सुनीती कुलकर्णी काम करीत होते. जयदेव तेव्हा कुठेतरी भाड्याच्या घरात राहात होता. पण सुनीती बऱ्याचदा मला जेवायला, रहायला तिच्या घरी न्यायची. साधनाच्या कार्यालयातील कर्मचाऱ्यांतही (खेडेकर, आपटे, तरटे, पाटील, देवळेकर इत्यादी) साधनाची संस्कृती व विचार दिसायचा. त्यानंतरचं एक वर्ष मी सय्यदभाईंच्याकडे राहिले. तेव्हा ते मुंबई-पुणे रस्त्यावर भारत पेन्सिल कारखान्याच्या आवारात रहात होते आणि त्या कारखान्यात व्यवस्थापक होते. त्यांच्या कुटुंबाचा मी एक भाग बनले. सय्यदभाई तर चळवळीत होते, पण मला विशेष उल्लेख करायचा आहे तो सय्यदभाईंच्या पत्नी अख्तर सय्यद यांचा. त्या माझ्या चाचीच. त्यांनी मला मुलीप्रमाणे सांभाळले. एक प्रकारे घरात राहूनही चाची चळवळीचं काम करीत होत्या. चाचींचा ठसा माझ्या मनावर कायमचा उमटला आहे तो यासाठी.

माझ्या आयुष्याचं विधायक वळण पुणे शहरातून सुरू झालं. इथेच एसेम, नानासाहेब, प्रधानसर, भाई वैद्य, बाबा आढाव, निळू फुले, ताहेरभाई पुनावाला, अनुताई लिमये, कमल पाध्ये, शोभनाताई इत्यादींना भेटले. आणखी एका नावाचा मला उल्लेख केला पाहिजे तो म्हणजे सुलभाताई ब्रह्मे. शंकर ब्रह्मे यांचा आणि माझ्या वडिलांचा चांगला परिचय. त्यामुळे सुलभाताई नेहमी मला माझ्या वडिलांबद्दल सांगत. माझ्या वडिलांचे निधन होईपर्यंत विचारत असत. या सर्वांच्या सहवासातून माझ्या व्यक्तिमत्त्वाची घडण होत गेलेली आहे.

या काळात देशभरात जी युवक चळवळ उभी राहिली त्याची सुरुवात गुजरात आणि बिहारमध्ये झाली होती. या आंदोलनाची सुरवात काही तात्कालिक मुद्यांवरून झाली असे दिसत असले तरी त्याला एक व्यापक पार्श्वभूमी होती. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भूमिहीन, दलित, कामगारवर्ग यांच्यात होत असलेली जागृती, जमिनीच्या हक्कासाठी उभे राहणारे लढे हे एकीकडे दिसत होते, पण दुसरीकडे तेलंगणा सारख्या चळवळींना हिंसकतेमुळे पडणाऱ्या मर्यादाही उघड होत होत्या. तिसरीकडे सत्तेद्वारा परिवर्तनाचा प्रयत्न अयशस्वी होतो आहे हेही स्पष्ट दिसत होते. अशा परिस्थितीत युवकांमधला असंतोष उफाळून आला तो गुजरात आणि बिहारमध्ये महाविद्यालयाच्या उपहारगृहांशी संबंधित आणि शिक्षण व्यवस्थेतल्या भ्रष्टाचाराच्या मुद्यावरून. या युवकांनी जयप्रकाशजींना आपलं नेतृत्व स्वीकारायची विनंती केली. सत्तेपासून दूर असलेले आणि अभ्रष्ट असलेले जे.पी. नेतृत्वासाठी युवकांना हवे होते. मात्र जयप्रकाशजींनी या युवकांना अट घातली ती अशी की, मी तुमच्या चार वा सहा महिन्यांच्या आंदोलनाचे नेतृत्त्व स्वीकारणार नाही, एका दीर्घकालीन लढ्यासाठी तुम्ही तयारी दाखवली पाहिजे. सर्वहारांची ही लढाई असेल. या पार्श्वभूमीवर छात्रयुवा संघर्षवाहिनीची स्थापना झाली होती.

'निर्दलीय शांतीमय संपूर्ण क्रांती के लिए छात्रयुवा संघर्षवाहिनी' हे संघर्षवाहिनीचं घोषवाक्य होतं. युवक हा परिवर्तनाचा वाहक असेल, पण कोणता युवक, जो निर्दलीय असेल. त्यांचं म्हणणं होतं, युवक राजकीय काम करतील, पण ते राजकीय पक्ष नसतील. 'संपूर्ण क्रांती सत्ता से नही हो सकती- कानून मदद करेगा, राजशक्ती मदद करेगी, लेकिन लोगोंको बदलना है, यह काम युवक करेंगे।'

संपूर्ण क्रांतीचा विचार हा सम्यक पद्धतीने विकसित झाला होता. त्यातली निर्दलीयता सर्वोदयी विचारधारेतून, वर्गसंघर्षाचा विचार कम्युनिझममधून, जातीअंताचा विचार लोहियांच्या विचारधारेतून आणि सत्याग्रह गांधी विचारातून आला होता. सर्वाचा समन्वय संपूर्ण क्रांतीच्या विचारात होता.

संघर्षवाहिनीची पूर्णवेळ कार्यकर्ती झाल्यावर मी महाराष्ट्र आणि महाराष्ट्राबाहेर बरीच राहिले. या संघटनेचं जे स्वरुप जे होतं त्यात सामूहिक नेतृत्व, संघर्षातून विचार आणि भूमिका विकसित करत नेणं असं होतं, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय प्रश्नावर भूमिका घेण्यासाठी संबंधित प्रश्नांवर झालेल्या चर्चा, संघटनेचं लोकतांत्रिक स्वरूप, घेतलेल्या भूमिका आणि कार्यक्रमांचं परखड मूल्यमापन आणि जयप्रकाशजींशीही वादविवादाची तयारी यातून कार्यकर्त्यांची घडण झाली. स्त्री-पुरुष समतेच्या मुद्यावर सखोल आणि वादळी चर्चा संघर्षवाहिनीच्या पुरुष साथींबरोबर झाल्या. संघर्षवाहिनीच्या वेगवेगळ्या आंदोलनात, संघर्ष करताना महिला साथी पुढे होत्या. अगदी महाराष्ट्रातील नामांतर आंदोलनापासून ते बिहारमधील बोधगया येथील मठाच्या महंताच्या विरोधात आणि आदिवासींच्या जमिनीच्या हक्कासाठीच्या लढ्यापर्यंत. बिहार, उत्तर प्रदेशमधील महिला या आंदोलनातून रस्त्यावर उतरणं ही किती महत्त्वाची गोष्ट होती, हे आजही त्या प्रांतांमधील स्त्रियांची स्थिती बघता आपल्या लक्षात येईल. स्त्री-पुरुष समतेचा हा विचार लढ्यातून सिद्ध झाला. आदिवासींना जमिनीचा हक्क मिळाला तेव्हा सातबाराच्या उताऱ्यावर, लढ्यात पुरुषांच्या बरोबरीने रस्त्यावर उतरलेल्या आणि पोलिसांचा लाठीमार सोसलेल्या स्त्रियांचेही नाव लागले पाहिजे हा वाहिनीच्या महिला साथींनी आग्रह धरला आणि बिहार उच्च न्यायालयाने त्याला मान्यता दिली. ही ऐतिहासिक घटना होती. शिवाय आडनावं टाकून जातीव्यवस्था मोडायची व आईचं नाव लावून पितृसत्ताक व्यवस्था तोडायची हेदेखील वाहिनीत घडले. याशिवाय खुली अर्थव्यवस्था, हिंदु-मुस्लिम संबंधाचे स्वरूप, जातीव्यवस्थागत विषमतेचा प्रश्न अशासारख्या मुद्यांवर चर्चा व्हायच्या. जयप्रकाशजींनी मांडलेला विचार यात केंद्रस्थानी असायचा. उदा. 'संपूर्ण क्रांती भारतमें किस रूपमे आएगी? भूमी स्वामीत्व, सत्तासंबंध इनमे परिवर्तन के रूपमें. सामाजिक क्रांतीमें जातीव्यवस्था बदलेगी- पिछडी जातीयों का संघटित

होना जरूरी है, भारत जैसे पिछडे देशके पिछडे अर्थक्षेत्रमें बहुत कुछ बदलने की जरूरत है. साथही व्यक्ती, समाज, शिक्षा, उद्योग, राजनीतीक व्यवस्थामें भी परिवर्तन की जरूरत है.' या मूलभूत मुद्यांवरील चर्चा आणि भूमिका. हिंदु-मुस्लिम संबंधाच्या बाबतीत बोलायचं तर जयप्रकाशजींची आवडती कविता होती मुहंमद इक्बाल यांची...

*सच कह दुं ऐ बरहमन, गर तू बुरा न माने*
*तेरे सनम कदों के बूत हो गए पुराने*

आजही विदर्भात मोहन हिराबाई हिरालाल, सतीश गोगुलवार, शुभदा देशमुख, मेटिखेडा येथे पूर्णपणे महिला पंचायत निवडून आणण्याचा प्रयोग (महिला आरक्षणाच्या आधी) घडवून आणणारी माया वानखेडे, समुचित तंत्रज्ञानाचा ग्रामीण विकासासाठी प्रयोग करणारा रमेश बोरोले, सुधाकर बडगुजर, कुंजबिहारी, आरोग्याच्या प्रश्नावर काम करणारे मनीषा, रमेश, हिंदु-मुस्लिम एकात्मतेच्या मुद्यावर मुंबईत कार्यरत असणारा जयंत दिवाण, मराठवाड्यात शेवटपर्यंत कामात असलेला संजय पतंगे, मराठवाड्यातच रचनात्मक संघर्ष समितीचं काम करणारा श्रीनिवास कुलकर्णी, माण तालुक्यात महिला बँक स्थापन करणारे चेतना आणि विजय सिन्हा ही वैचारिक, राजकीय, सामाजिक बांधिलकी पक्की झालेली पिढी आजतागायत सक्रिय दिसते.

छात्रयुवा संघर्षवाहिनीत काम करत असताना आणखी एका गोष्टीचा प्रभाव माझ्यावर पडला, तो म्हणजे बिहारमधील कवी दुष्यंतकुमार यांनी चळवळीसाठी लिहिलेल्या गीतांचा. या गीतांची इतकी धास्ती त्यावेळच्या दमनयंत्रणेने घेतली होती की, बस्स! केवळ कवितांमधूनदेखील क्रांतिकारी विचार मांडता येऊ शकतो, गीतंदेखील चळवळीची प्रेरणा ठरू शकतात याचं उत्कृष्ट उदाहरण म्हणजे दुष्यंतकुमार यांच्या गझला आणि गीतं. त्या काळात या गीतांचंही प्रचंड आकर्षण युवकांमध्ये होतं.

त्यांनी दमनकारी राज्यसत्तेवर, दाभिंकपणावर तर ताशेरे ओढलेच आहेत, पण भारतातील सर्वसामान्य, शोषित माणसाबद्दलही त्यांची कविता बोलते. संघर्षवाहिनीची एकही बैठक दुष्यंतकुमार यांच्या गीताशिवाय संपली नाही. बैठकांमधून गायली जाणारी काही गीतं अशी होती...

*हो गई है पीर परबतसी पिघलनी चाहिए*
*इस हिमालय से कोई गंगा निकलनी चाहिए*
*सिर्फ हंगामा खडा करना मेरा मकसद नही*
*मेरी कोशिश है कि यह सूरत बदलनी चाहिए*

किंवा

*ये सारा जिस्म झुककर बोझसे दुहरा हुवा होगा*
*मै सजदेमें नही था आप को धोखा हुवा होगा*
*यहांतक आते आते सूख जाती है कई नदियां*
*मुझे मालूम है पानी कहां ठहरा हुवा होगा।*

किंवा

शोषितांसाठी लोकशाहीचं महत्त्व सांगतानाची त्यांची गझल...

*वो आदमी नही है मुकम्मल बयान है*
*माथे पे उसके चोट का गहरा निशान है*
*सामान कुछ नहीं है फटेहाल है मगर*
*झोलेमे उसके पास कोई संविधान है।*

अशासारख्या कवितांनीसुद्धा एक चेतना निर्माण केली होती.

या प्रकारची चेतना जागृती आणि कार्यकर्त्यांची घडण या आंदोलनातून होत असताना जळगाव येथील मुस्लिम समाजाच्या पंचकमिटीने, मुस्लिम महिलांना सिनेमाबंदीचा फतवा काढला. हे सिनेमाबंदी प्रकरण काय होते?

**सिनेमाबंदी विरोधी लढा**

२ ऑगस्ट १९८१, रमझान ईदचा दिवस. जळगाव शहरातील शनिपेठ भागातील एका मुस्लिम मोहल्ल्यात मुस्लिम पंचायत कमिटीची एक बैठक झाली. या बैठकीत मुस्लिम पंचकमिटीने असा फतवा काढला की, सध्या 'सिनेमामुळे समाजात वाढत असलेली गुंडागर्दी आणि सिनेमापासून होणारे कुसंस्कार टाळण्यासाठी आणि सिनेमातील गुंडागर्दीमुळे आपापसात होणारी भांडणे व जातीय दंगे उद्भवू नयेत यासाठी आमच्या समाजातील महिलांना आम्ही सिनेमागृहात जाण्यासच बंदी घालत आहोत.'

याच पत्रकात नमूद करण्यात आले होते की, मुस्लिम पंचकमिटीच्या या निर्णयानंतर जर एखादी महिला सिनेमा पहाण्यास गेलेली आढळली तर तिला ५१ रुपयांपासून १५१ रुपयांपर्यंत दंड ठोठावण्यात येईल. तसेच तिच्या कुटुंबावर मुस्लिम समाजाकडून बहिष्कार टाकण्यात येईल.

मुस्लिम महिला या निर्णयानंतर सिनेमाला गेल्याचे शोधून काढायचे कसे, तर त्या त्या मोहल्ल्यातील तरुण मुलांनी सिनेमागृहांवर नजर ठेवायची आणि आपल्या मोहल्ल्यातील महिला सिनेमाला येताना दिसल्या तर त्यांना रोखायचे, पंचकमिटीला त्यांची नावे सांगायची. अर्थातच ही मुले काहीही कामधंदा नसलेली मुले होती. स्वत:चा काही रोजगार नसल्यामुळे दिवसभर टवाळक्या करणारी, मुस्लिम मुले यात उत्साहाने पुढे सरसावली आणि पानटपऱ्याऐवजी सिनेमागृहांसमोर घोळक्याने उभी राहू लागली. हळूहळू या सिनेमाबंदीचे लोण पूर्ण जिल्हाभर पसरले. जळगाव शहरात तर लागोपाठ सर्व मुस्लिम मोहल्ल्यांमध्ये तिथल्या प्रतिष्ठित मुस्लिम रहिवाशांनी बैठका घेऊन हा निर्णय घेतलाच, पण जिल्ह्यातल्या सर्व तालुक्याच्या आणि छोट्या शहरांमध्येही मुस्लिम समाजातील नेतृत्वाने सिनेमाबंदीचा फतवा काढला. अशा तऱ्हेने चोपडा, यावल, भुसावळ, रावेर, जामनेर, धुळे जिल्ह्यातील दोंडाईचा इत्यादी शहरांमध्ये मुस्लिम महिलांसाठी सिनेमाबंदी लागू केल्याच्या बातम्या आल्या.

शिवाय महाराष्ट्राबाहेर कर्नाटकात विजापूर येथेही मुस्लिम महिलांना सिनेमाबंदी केल्याची बातमी वर्तमानपत्रात आली. मुस्लिम पंचकमिट्यांनी मुस्लिम महिलांना सिनेमाबंदी केल्याच्या निर्णयाची पत्रके वर्तमानपत्रांनाही दिली. तसेच समाजातही वाटली, जेणेकरून या निर्णयाची माहिती सर्व समाजाला व्हावी.

ज्या मुस्लिम पंचकमिट्यांनी ठिकठिकाणी सिनेमाबंदीचा फतवा जाहीर केला, त्या पंचकमिट्यांचे सदस्य मुल्ला मौलवी तर होतेच, शिवाय त्या-त्या

भागातील तथाकथित समाजसेवक आणि राजकीय पक्षांचे सदस्य, नगरसेवक जास्त संख्येने होते. मशिदीच्या इमामांपासून, राजकीय पक्षांच्या स्थानिक पुढाऱ्यांपर्यंत या पंचकमिट्यांमध्ये सदस्य होते. पण त्यातील असे किती चारित्र्यवान होते? शिवाय एकही मुस्लिम स्त्री या कमिट्यांमध्ये नव्हती.

मुस्लिम महिलांना सिनेमाबंदी करण्यात आल्याच्या बातम्या वर्तमानपत्रात आल्या आणि त्यानंतर उलट-सुलट प्रतिक्रिया यायला सुरुवात झाली. त्यात सुशिक्षित मुस्लिम तरुणांच्या प्रतिक्रिया तसेच मुस्लिमेतर समाजातून आलेल्या प्रतिक्रिया यांचा समावेश होता.

मुस्लिम पंचकमिटीने महिलांना सिनेमाबंदी केल्याच्या निर्णयानंतरही काही मुस्लिम महिला सिनेमाला गेल्या तेव्हा पंचकमिट्यांनी नेमलेल्या तरुण मुस्लिम मुलांनी त्यांना चित्रपटगृहाबाहेर ओढून काढले आणि त्यांची धिंड काढली. अशी आठ-दहा प्रकरणे घडली.

जळगाव शहरात तरुणांमध्ये कार्यशील असलेल्या छात्रयुवा संघर्ष वाहिनीच्या जळगाव येथील शाखेची सिनेमाबंदीच्या निर्णयासंबंधी बैठक झाली. या बैठकीत पंचकमिटीच्या फतव्यासंबंधी तसेच वर्तमानपत्रांमध्ये आलेल्या प्रतिक्रियांसंबंधी चर्चा करण्यात आली. मी तेव्हा संघर्ष वाहिनीची सदस्य आणि पूर्णवेळ कार्यकर्ती होते. या बैठकीत असा निर्णय घेण्यात आला की, मी आणि संघर्ष वाहिनीची आणखी एक महिला सदस्य अरुणा तिवारी यांनी मुस्लिम मोहल्ल्यांमध्ये जाऊन मुस्लिम महिलांच्या या संबंधीच्या प्रतिक्रिया समजून घ्याव्यात.

आम्ही दोघी मुस्लिम मोहल्ल्यांमध्ये गेलो आणि मुस्लिम महिलांशी यासंबंधी बोललो. ज्या महिलांना चित्रपटगृहाबाहेर ओढून काढून त्यांची धिंड काढण्यात आली होती अशा महिलांनाही भेटलो. एकूण मुस्लिम महिलांमध्ये सिनेमाबंदीच्या फतव्याविषयी तीव्र नाराजी नव्हती, पण पंचकमिट्यांना हा अधिकार आहे का आणि पंचकमिट्या ज्या पद्धतीने हा निर्णय राबवीत होत्या, त्याबद्दल त्या संतापाने बोलत होत्या.

महिलांचे म्हणणे काय आहे हे समजावून घेण्यासाठी आणि मांडण्यासाठी समाजाने व्यासपीठ अर्थातच दिले नव्हते. त्यामुळे आम्ही या सर्व प्रतिक्रिया वर्तमानपत्रांतून मांडायचे ठरवले.

१. सर्व समाजाला त्यातही महिलांना विश्वासात न घेता मुस्लिम पंचकमिटीने सिनेमाबंदीचा निर्णय कसा घेतला?
२. पंचकमिटीत एकही महिला सदस्य नसताना मुस्लिम महिलांसाठी सिनेमाबंदीचा निर्णय कसा घेण्यात आला?
३. सिनेमाबंदीसाठी जर पंचकमिटी इस्लामचा आधार घेत असेल आणि वाईट गोष्टी बघू नका असे धर्म सांगतो अशी भूमिका घेत असेल तर मग पुरुषांनाही सिनेमाबंदी का नको?
४. धर्माच्या नावाने पंचकमिटी समाजसुधारणेची भूमिका घेते तेव्हा समाजात चाललेल्या सर्वच वाईट गोष्टींना विरोध करण्याची जबाबदारी पंचकमिटी का घेत नाही?
उदा. पंचकमिटीचे सदस्य असलेल्या लोकांचे वा त्यांच्या परिवारातील सदस्यांचे जुगाराचे अड्डे, दारुच्या भट्ट्या आहेत, काही सदस्यांवर चोरीचे, भ्रष्टाचाराचे, छेडछाडीचे आरोप आहेत. त्यांना सुधारण्यासाठी फतवा काढण्याची पंचकमिटीला गरज का वाटत नाही?
५. सिनेमा बघण्याने वाईट संस्कार होत असतील तर ते केवळ स्त्रियांवर नाही तर पुरुषांवरही होत असणार. मग पंचकमिटी पुरुषांनाही सिनेमाबंदीचा फतवा का काढत नाही?
६. भारताच्या संविधानाने भारतीय नागरिकांना मनोरंजनाचा अधिकार दिला आहे. तेव्हा पंचकमिटी असे फतवे काढून हा अधिकार हिरावून घेऊ शकते काय?
७. मुस्लिम महिलांना चित्रपटगृहाबाहेर ओढून काढून, अपमानास्पद वागणूक देऊन बहिष्कृत करण्याचा अधिकार पंचकमिटीला आहे का?
८. त्याच काळात दारू प्यायल्याने बंगलोर येथे ३२५ लोक मृत्यू पावले. त्या दारू दुकानाचा मालक सय्यद अमीर सुलतान हा मुस्लिम आहे. पंचकमिटीने त्याचा निषेध का केला नाही?
९. पंचकमिटी म्हणते इथे इस्लामी सत्ता नसल्याने आजही मुस्लिम महिला व्यासपीठाने सांगितलेल्या गोष्टी अंमलात आणू शकत नाही, तेव्हा पंचकमिटी कायदा हातात घेऊन मुस्लिम महिलांना सिनेमा बघितला म्हणून दंड करणे, धिंड काढणे, बहिष्कृत करणे हे तरी कसे करू शकते?

वर्तमानपत्रातून मुस्लिम महिला व्यासपीठाकडून जे मुद्दे मांडले गेले त्यामुळे सुशिक्षित मुस्लिम तरुण, समंजस मुस्लिम नागरिक यांचा पाठिंबा आम्हाला मिळायला लागला आणि बेकायदा सिनेमाबंदीसंबंधी रोज वर्तमानपत्रात पत्रे येऊ लागली. अशा रीतीने मुस्लिम महिलांना सिनेमाबंदी विरोधात समर्थन मिळू लागले.

**छात्रयुवा संघर्षवाहिनीत काम करत असताना आणखी एका गोष्टीचा प्रभाव माझ्यावर पडला, तो म्हणजे बिहारमधील कवी दुष्यंतकुमार यांनी चळवळीसाठी लिहिलेल्या गीतांचा. या गीतांची इतकी धास्ती त्यावेळच्या दमनयंत्रणेने घेतली होती की, बस्स. केवळ कवितांमधूनदेखील क्रांतिकारी विचार मांडता येऊ शकतो, गीतंदेखील चळवळीची प्रेरणा ठरू शकतात याचं उत्कृष्ट उदाहरण म्हणजे दुष्यंतकुमार यांच्या गझला आणि गीतं. त्या काळात या गीतांचंही प्रचंड आकर्षण युवकांमध्ये होतं. त्यांनी दमनकारी राज्यसत्तेवर, दाभिंकपणावर तर ताशेरे ओढलेच आहेत, पण भारतातील सर्वसामान्य, शोषित माणसाबद्दलही त्यांची कविता बोलते. संघर्षवाहिनीची एकही बैठक दुष्यंतकुमार यांच्या गीताशिवाय संपली नाही.**

१४ फेब्रुवारी १९८२ रोजी रेहाना शेख नावाच्या मुस्लिम महिलेवर हल्ला करण्यात आला. ती तिच्या पतीसोबत सिनेमा बघायला गेली होती. सिनेमा बघून परतत असताना तिच्या मोहल्ल्यातील सय्यद अकीलने, ज्याला पंचकमिटीचा आश्रय होता- विचारले की, 'सिनेमाबंदी असताना तू सिनेमा बघायला का गेली'? रेहाना म्हणाली, ''मी माझ्या पतीसोबत गेले होते आणि इस्लाम म्हणतो पतीची आज्ञा पाळा.''

तिच्या या उत्तरामुळे सय्यद अकील रागावला आणि त्याने रेहाना तिच्या पतीवर हल्ला केला. त्यात रेहानाचा पती सलीम याच्या डोळ्याला गंभीर इजा झाली आणि रेहानाचा ओठ कापला गेला.

या घटनेचा निषेध मुस्लिम महिला व्यासपीठाने तर केलाच, पण मुस्लिम महिलांच्या बैठकाही वाढवल्या. जास्त मुस्लिम मोहल्ल्यांमध्ये संपर्क सुरू केला. भुसावळ शहरातील मुस्लिम महिलांच्या सभेलाही उपस्थित राहून एकजूट जाहीर केली. एक मुस्लिम भगिणी म्हणाली, 'ये लोग सिर्फ मुर्गीयोंको मार सकते है, उन बिल्लोंको नही मार सकते, जिनके मुंहमे खून लगा है।' इतकी राजकीय सामाजिक समज त्यांची होती. त्या आपली अभिव्यक्ती स्वत:च्या भाषेत करीत होत्या.

मुस्लिम महिला समितीच्या बैठकीत असा निर्णय घेण्यात आला की, १९४२ च्या ८ मार्चला जागतिक महिला दिनी सिनेमाबंदी विरुद्ध आंदोलन करायचे. त्यानुसार कार्यक्रमाची आखणी करायला सुरुवात केली. त्यात असे ठरले की, 'सिनेमाबंदी विरोधात हा 'सत्याग्रह' असेल. आम्ही शांतपणाने, कोणालाही आक्रमकपणाने विरोध न करता सिनेमाबंदी झुगारून देऊ. हा सत्याग्रह आम्ही करू, कारण आमचीच एक भगिनी रेहाना हिच्यावर हल्ला झाला आहे. ज्या सिनेमामुळे तिच्यावर हल्ला झाला तोच सिनेमा आम्ही प्रतिकात्मक स्वरूपात पाहू. आम्ही सिनेमागृहापर्यंत जाऊ. सिनेमाबंदी आम्ही झुगारून लावतो आहोत हे जाहीर करू आणि परत येऊ.'

रेहानाला पोलीस स्टेशनमध्ये तक्रार नोंदवायला नेले. पोलिसांनी फारसे सहकार्य दिले नाही. कारण पंचकमिटीमध्ये सत्ताधारी पक्षाचे लोक होते.

मग सिनेमाबंदीच्या सत्याग्रहासाठी पोलिसांना सूचना दिली. त्यानंतर वातावरण तापत गेले. प्रत्यक्ष सत्याग्रहाच्या दिवशी म्हणजे ८ मार्च १९८२ रोजी पोलिसांना बंदोबस्त ठेवावाच लागला, कारण वातावरणात तणाव होता. आम्हाला धमक्या, दगडफेक इत्यादी प्रकार सुरू झाले होते.

त्यावेळच्या पोलीस अधिकाऱ्यांनी मला बोलावून घेतले आणि सांगितले की, 'तुम्ही सामाजिक शांतता भंग करीत आहात, त्यामुळे तुम्हाला मी 'वॉर्निंग' देत आहे.' मुस्लिम स्त्रियांच्या प्रश्नाच्या आंदोलनात अनेक वेळा हा अनुभव आलेला आहे की, मुस्लिम सुधारकांना तंबी देऊन, मुस्लिम गुंडांना प्रशासन पाठीशी घालते.

या सर्व विरोधानंतरही वेगवेगळ्या मुस्लिम मोहल्ल्यात बैठकांना प्रतिसाद चांगला मिळाला. मात्र सिनेमागृहवाले तिकिटे द्यायला तयार होईनात. त्यांना भीती वाटत होती. त्यावेळी आम्हाला अंमळनेर येथील जनता पक्षाचे माजी आमदार श्री.गुलाबराव पाटील यांनी मदत केली आणि तिकिटांची रक्कम स्वत: भरून आम्हाला तिकिटे काढून दिली.

८ मार्चला मोहल्ल्या-मोहल्ल्यातून मुस्लिम स्त्रिया आल्या. जवळपास दोनशे स्त्रिया बाहेर निघाल्या. मात्र रस्त्यात झालेली दगडफेक आणि दहशतीमुळे ८० स्त्रिया चित्रपटगृहापर्यंत पोचल्या. त्या सर्वांनी सिनेमा प्रतिकात्मक रूपात पाहिला आणि सिनेमाबंदी झुगारून दिल्याचे घोषित केले.

या सत्याग्रहाची बातमी सर्व वर्तमानपत्रांनी दिली. 'टाईम्स ऑफ इंडिया'ने अग्रलेख लिहिला. मात्र सत्याग्रहात सहभागी झालेल्या महिलांना धमक्या, छळ, दशहतवाद इत्यादींना तोंड द्यावे लागले. त्यासंबंधी आम्ही पुन्हा जाहीर वाच्यता केली. आणि महाराष्ट्राच्या विधान परिषदेत विरोधी पक्षनेते प्रा.ग.प्र.प्रधान यांनी प्रश्न उपस्थित केला. महाराष्ट्र विधान परिषदेचे सभापती श्री.रा.सु.गवई यांनी ही सिनेमाबंदी अवैधानिक असल्याचे सांगितले. सत्याग्रही महिलांना संरक्षण मिळावे अशी मागणी विरोधी पक्षांनी केली. त्यामुळे त्यावेळचे गृहराज्यमंत्री डॉ.श्रीकांत जिचकर यांना तसे आश्वासन द्यावे लागले.

त्यानंतर पंचकमिट्या आपोआपच निष्क्रिय झाल्या. रेहानावर हल्ला करणाऱ्या सय्यद अकीलला राष्ट्रीय सुरक्षा कायद्याखाली अटक करण्यात आली.

महाराष्ट्रातील इतर शहरांमध्ये लागू सिनेमाबंदीच्या विरोधात निदर्शने झाली. कर्नाटकात प्रा.नजमा बांगी यांनी निषेध नोंदवला.

अन्य शहरांतील मुस्लिम महिलांवरील सिनेमाबंदी उठवली गेली.

देशभरातून अभिनंदन आणि समर्थन करणारी जी पत्रे आली त्यात जास्त पत्रे मुस्लिम तरुण-तरुणींची होती. अगदी काश्मीरच्या युवकांची पत्रेही त्यात होती, मात्र सिनेमाबंदी आंदोलनानंतर दशहतही खूप वाढली. मी कोणाची मुलगी वगैरेंचा शोध पंचकमिटीच्या लोकांनी घ्यायचा प्रयत्न केला. शिवाय संघर्षवाहिनीच्या कार्यालयावर रात्रीच्या वेळी दगडफेक केली गेली. प्रचंड दहशत आणि धमक्या यांमुळे सर्वसामान्य मुस्लिम महिलांवरही दडपण आले. मला सरकारने पोलिस संरक्षण दिले. त्यातून मी लवकरच सुटका करून घेतली. मात्र मुस्लिम महिलांमध्ये काम करण्याबाबत माझ्या मनातील विचारचक्र त्यानंतर वेगाने फिरू लागले...

मुस्लिम महिलांमध्ये आत्मविश्वास आला.

दहशतीमुळे पुढे काम वाढायला अडचणी खूप आल्या तरी पुन्हा सिनेमाबंदीसारखे फतवे काढता येणार नाहीत हे पंचकमिट्या आणि तथाकथित नेते यांना पुरेपूर उमगले.

(क्रमश:)

**रजिया पटेल**
P-17, सुयोग हाईट्स, रामबाग कॉलनी,
पौड रोड, पुणे ४११०३८.
raziap@gmil.com.
Mob. : 9823074054

वाचणाऱ्याची रोजनिशी

सतीश काळसेकर

# ।। वर्तमान तपासण्यासाठी... ।।

आपण वाचनासंदर्भात बोलतो तेव्हा कोणत्या वाचनाविषयी बोलतो. वेळ जात नाही म्हणून केल्या जाणाऱ्या वाचनाविषयी आपण बोलत नाही. आपणासाठी हा फावल्या वेळावा व्यापार नाही. आपण त्यासाठी आपल्या एकमेव आयुष्यातला अमूल्य वेळ देत असतो. किंबहुना आपण वाचतो त्यातून बहुतांश वेळा आपण डोक्याला तापच देत असतो. तर आपण आपल्या वाचत असलेल्या ग्रंथांच्या प्रकाशात आपले आयुष्य तपासत असतो. आणि 'आपले आयुष्य' असे म्हणत असताना ते काही आपल्या एकट्याचे केवळ खाजगी आयुष्य नसते. त्यात ते तर असतेच, पण त्याच्यासोबतच आपले कुटुंब, सगेसोयरे, आपला समाज, आपला देश, अवघे चराचर विश्व, निसर्गातली सजीव आणि निर्जीव सृष्टी आणि आपला इतिहास आणि भूगोल असा विशाल गोतावळा यात असतोच असतो. आणि त्यानंतर या तपासात आपल्या वाट्याला येतात विविध अनुभवांचे क्षण. आशा, निराशा, उमेद, उत्साह आणि खिन्नताही.

गेल्या काही दिवसात मी झपाटल्यासारखा वाचत आहे. फिडेल कॅस्ट्रोचे आत्मचरित्र 'माय लाईफ', मायकेल डी. येटस्‌चे अमेरिकन प्रवासाचे वर्णन 'चीप मोटेल्स ॲन्ड ए हॉट प्लेट'. सईद मिर्झाचे 'अम्मी : ए लेटर टू ए डेमॉक्रॅटिक मदर'. अरुंधती रायचे 'दी शेप ऑफ दी बिस्ट' आणि तिचे इस्तंबूलमध्ये झालेले भाषण, नोम चोम्स्कीचे लेखन, शिवाय हिंदीतले 'बनास', 'पक्षधर', 'पहल' यांचे सणसणीत मजकूर हाती देणारे अंक, शिवाय मराठी तर आहेच. उत्तम कांबळे यांची 'एका स्वागताध्यक्षाची डायरी', सुनंदा अमरापूरकरांचा हेरॉल्ड एस. कुशनर यांच्या ग्रंथाचा अनुवाद 'व्हेन बॅड थिंग्ज हॅपन टू गुड पिपल', शिवाय सुनंदा महाजनांचा 'होलोस्कॉस्टच्या कविता', 'सारंग दर्शनेचा सुधीर ककरच्या ग्रंथाचा अनुवाद 'मीरा आणि महात्मा', फौझिया सईदच्या 'टॅबू'चा रेखा देशपांडेकृत अनुवाद, बाल्झाकच्या एजेनी ग्रांदेचा श्री.मा.भावेंनी केलेला अनुवाद, नीलम पारीखांचा हरिलाल गांधींवरचा ग्रंथ 'गांधीजींचा हरवलेला ठेवा', सुधीर देवरेंचे छोटेखानी आत्मचरित्र 'पंख गळून गेली तरी', अरूंधती राय यांच्या दोन निबंधांचा मराठी अनुवाद 'असीम न्यायाचे गणित


## 'सुमेरू प्रकाशन' द्वारा प्रकाशित
## डॉ. जयसिंगराव पवार यांची पुस्तके

**राजर्षी शाहू छत्रपती : जाहिरनामे हुकूमनामे**
पृष्ठे : १४४ किंमत : रु. १२०/-

**राजर्षी शाहू महाराज : एक मागोवा**
पृष्ठे : १०८ किंमत : रु. १००/-

**आमच्या इतिहासाचा शोध आणि बोध**
पृष्ठे : ८० किंमत : रु. ८०/-

**शिवचरित्रापासून आम्ही काय शिकावे?**
पृष्ठे : ८० किंमत : रु. ९०/-

**शिवछत्रपती : एक मागोवा**
पृष्ठे : १५२ किंमत : रु. १४०/-

**छत्रपती संभाजी महाराज : एक चिकित्सा**
पृष्ठे : १६० किंमत : रु. १४०/-

**मराठेशाहीचे अंतरंग**
पृष्ठे : १४४ किंमत : रु. १४०/-

**मराठ्यांचे स्वातंत्र्ययुद्ध**
पृष्ठे : २३२ किंमत : रु. २००/-

**राजर्षी शाहू छत्रपती : पत्रव्यवहार आणि कायदे**
पृष्ठे : १२८ किंमत : रु. १००/-

**राजर्षी, कर्मवीर आणि प्रबोधनकार ठाकरे**
पृष्ठे : ६४ किंमत : रु. ५०/-

**राजर्षी शाहू महाराज : एक अभ्यास**
(सौ. वसुधा पवार)
पृष्ठे : ११२ किंमत : रु. १२०/-

आगामी

**सेनापती संताजी घोरपडे**
पृष्ठे : १९२ किंमत : रु. २००/-

**राजर्षी शाहू छत्रपतींची भाषणे**
पृष्ठे : १०४ किंमत : रु. ८०/-

सुमेरू प्रकाशन
डी-६, राजहंस, टिळकनगर, डोंबिवली (पू.) ४२१२०१
: ०२५१ - २४०४१४१/२४३५१६८/०२४०-२३५१८७८

आणि इन्सन्ट मिक्स, लोकशाही', विजय पाडळकरांचे अकिरा कुरोसावाच्या 'राशोमन'वरचे 'गर्द रानात भर दुपारी', प्रज्ञा दया पवारचे कवितेतून बाहेर येत नाटकाकडे वळलेले पहिले पाऊल 'धादांत खैरलांजी' हे आणि असे कितीतरी अधलेमधले लेखन. संदर्भाने पुन्हा मागे वळलो आणि एल्ड्रिज क्लिव्हरचे 'सोल ऑन आइस' पुन्हा पहिल्यांदाच वाचावे तसे नव्याने वाचले. आता आठवले नाही असेही असणार. काहींविषयी आधीही बोललो आहे. काहींविषयी आज बोलायचे आहे. काहींविषयी नंतरही बोलेन. पण आपणाला सांगायला आनंद वाटतो की यातल्या प्रत्येक ग्रंथाने मला वर्तमान तपासायला मदत केली. यातल्या जवळपास सगळ्याच लेखकांचा, अनुवादकांचा त्यांची निर्मिती आपल्यापर्यंत आणण्याचा तो प्रधान हेतू आहे. यापैकी कोणीच आपल्या निर्मितीकडे केवळ 'कमॉडिटी' किंवा 'वस्तू' म्हणून पाहिलेले नाही. आणि आपणही त्याकडे तसे पाहू नये यावर त्यांचा जाहीर किंवा मूक कटाक्ष आहे. यातला प्रत्येकजण आपल्या वर्तमानकाळाविषयी चांगल्या अंगाने असमाधानी आहे. 'जो है उससे बेहतर चाहिये.' 'पर्यायी सुंदर जग शक्य आहे'. आणि तसे जग उभे करण्याचा ध्यास यातल्या प्रत्येकाचा आहे. "We shall have our manhood. We shall have it or the earth will be leveled by our attempts to gain it." १९ जून १९६५ ला माल्कम एक्स या अमेरिकन निग्रो बंडखोर नेत्याच्या खुनाची बातमी कळल्यावर एल्ड्रिज क्लिव्हरने हे उद्‌गार तुरुंगातून काढले होते. त्याचा मराठी तर्जुमा साधारण असा करावा. ''आम्ही आमचं माणूसपण मिळवूच. आम्हाला ते मिळणारच. अथवा आमच्या प्रयत्नांतून ते मिळवताना ही पृथ्वी समतल करू.'' 'समतल'ऐवजी 'नांगरून घेऊ' अधिक आवडले असते. असो.

आता एल्ड्रिज क्लिव्हरचा हा ग्रंथ केव्हातरी सत्तरीच्या दशकातच वाचला होता. पण नुकतेच सईद मिर्झाच्या लेखनात ते वाक्य अचानक आले आणि पुन्हा 'सोल ऑन आइस'च्या पानांतून त्या वाक्याचा वेध घेतला. सईद मिर्झाच्या 'अम्मी : ए लेटर टू ए डेमॉक्रॅटिक मदर'चा अनुवाद तातडीने मराठीत व्हायला हवा. परवाच्या विश्वासदर्शक ठरावावरल्या संसदीय गदारोळात तुम्ही ओमर अब्दुल्ला या काश्मीरच्या तरुण खासदाराला बोलताना ऐकले आणि पाहिले आहे का? त्याला पाहताना मला सईद मिर्झाच्या लेखनाची आठवण झाली.

आता शक्य आहे की आपल्यापैकी अनेकांकडे दूरदर्शन संच असणार, पण तो चालावा यासाठी वीज नसणार. मी तर चक्क डोंगरातच. आणि आदिवासींचे पाडे, त्यांच्या अनेक घरांतून वीजच नाही किंवा विजेच्या बिलाचे पैसे


पाचवी आवृत्ती

# जोहड

अल्पावधीत अनेक पुरस्कार प्राप्त करणारी
**चरित कादंबरी**

- 'कवि रा.ना. पवार' पुरस्कार (२००२)
- 'अक्षर तपस्वी' पुरस्कार (२००२)
- 'दमाणी साहित्य' पुरस्कार (२००२)
- 'अंकुर साहित्य संमेलन पुरस्कार' (२००२)
- पुणे नगर वाचन मंदिराचा 'श्री.ना. बनहट्टी' पुरस्कार (२००३)
- महाराष्ट्र साहित्य परिषदेचा 'वा.म. जोशी' पुरस्कार (२००३)
- 'मृत्युंजयकार' शिवाजी सावंत कादंबरी पुरस्कार (पहिला २००४)
- 'कमलाबाई ओगले' मेहता पुरस्कार (२००४)
- प्राणीमित्र विलास शहा प्रतिष्ठानचा सामाजिक कृतज्ञता पुरस्कार (२००४)
- मराठी साहित्य मंडळ, गुलबर्गा, कर्नाटक, डॉ. पंडित आवळीकर पुरस्कार (२००४)
- पुणे मराठी ग्रंथालयं : चेतना पुरस्कार (२००८)

आठ रंगीत पानांसहित
अनेक भारतीय व अन्य भाषांत संकल्पित अनुवाद
**लेखिका : सौ. सुरेखा शहा**
पृष्ठे : २४०  किंमत : रुपये २६०/-

सुमेरु

**सुमेरु प्रकाशन**
डी-६, राजहंस, टिळकनगर, डोंबिवली (पू.) ४२१२०१
( : ०२५१ - २४०४१४१/२४३५१६८/०२४०-२३५१८७८

भरावेत असे आर्थिक बळही नाही. ती विजेच्या तारांवर आकडे टाकतात. असे आकडे सर्रास आठवडी बाजारात मिळतात. आता त्यांनी आकडा टाकला आणि टाकताना त्यांचा तारेचा वेध चुकला आणि आकड्याचा स्पर्श दोन तारांना झाला की फेज उडतो आणि वीज गायब. हा प्रकार वारंवार. म्हणजे आधीचे भारनियमन आणि त्यात ही भर. अशी वीज गायब. आता हा सगळा अजब मामला हा आपल्या देशातला अंतर्विरोध. पण हे वास्तवच. चक्क मेणबत्तीच्या प्रकाशात संगणक चालवताना (बॅकअप पॉवरच्या साहाय्याने) मी पाहिला आहे. अरुंधती रायने आपल्या लेखनात हा अंतर्विरोध नोंदवला आहे. अगदी प्रभावी भाषेत आणि तार्किक प्रतिवादात. पण आपला या संदर्भातला राग आपण व्यक्त करतोच. एल्ड्रिज क्लिव्हरचे एक वाक्य असेच समोर आहे. "At one time it seems absolutely clear and at other times I do not believe in it." अरुंधती रायचे लेखन वाचताना आपल्याही समोर अनेक प्रश्न येतात. काहीशी गोंधळाची परिस्थिती. वीज हवी. गरज अधिक विजेची. एक बाजू सांगणार अणुऊर्जा तर दुसऱ्यांना अणुऊर्जा वर्ज्य. मधल्यांचे आणखीच वेगळे प्रश्न. पण विजेची गरज खरी आहे.

तेव्हा वळलो पुन्हा फिडेल कॅस्ट्रोच्या आत्मचरित्राकडे. पान ६१३ वर तो म्हणतो, "The examples of solar panels for constant electricity, which never interupted, to every little nook and hollow in the country side." हा त्याच्या क्युबन राजसत्तेचा अनुभव. आपल्याकडेही सौरऊर्जेचा उपयोग हिमालयाच्या पहाडी भागात मी पाहिला आहे. औरंगाबादमधल्या एका मित्राचे पूर्ण आवार, घरातली विजेवर चालणारी सारी यंत्रणा सौरऊर्जेच्या माध्यमातून चालत आहे. थोड्याफार अधिक-उण्या शक्यता गृहीत धरूनही सौरऊर्जेचा पर्याय हा अन्य वीजनिर्मितीची पर्यायांना पूरक म्हणून विचारात घ्यायलाच हवा. दामोदर धर्मानंद कोसंबी या ज्ञानी माणसाने जवळपास पन्नास वर्षांपूर्वीच सौरऊर्जेच्या पूरक पर्यायाचा विचार मांडला होता. पण त्याकडे आपल्या सत्ताधाऱ्यांनी लक्षच दिले नाही. विकासाचे एक प्रारूप त्यांच्यासमोर असावे किंवा होते. त्यांच्या प्रामाणिक असण्याचीही खात्री आहे. पण आज ते प्रारूप (त्याला नेहरुप्रणित विकासाचा आकृतीबंध असे मानतात.) तसेच्या तसे कामी येत नाही हे ओळखायला हरकत नसावी. फिडेल कॅस्ट्रोचा क्यूबा, त्याचे आत्मचरित्र तर आपल्यासमोर साक्षातच आहे, पण अरुंधती राय जशी हट्टी आणि आग्रही तशीच आपली सत्तेवर असलेली वयाची सत्तरी गाठलेली ज्येष्ठ मंडळीही. या ज्येष्ठांनी फिडेल कॅस्ट्रोचे 'माय लाइफ' अवश्य वाचावे. अर्थात इथेही अरुंधती राय आठवतेच. तिचे म्हणणे ही बुश


वेद कालापासून आजतागायत
पाण्यासंबंधीचे सर्वकाही
सामावून घेणारा ग्रंथराज

**भारतीय जलसंस्कृती :**
**स्वरूप आणि व्याप्ती**

- काश्मिरपासून कन्याकुमारीपर्यंत आणि सिंधू खोऱ्यापासून गंगा, भागीरथी, तुंगभद्रा, कावेरी खोऱ्यापर्यंत व्याप्ती. असणारा जल संस्कृतीचा प्रदीर्घ इतिहास.
- पाण्यासंदर्भातील रंगीत छायाचित्रांसहित एक नितांत महत्त्वपूर्ण ग्रंथ. संदर्भ सूची, सूची, विषय सूची आणि परिशिष्टासहित
**पृष्ठे : ३८४ किंमत : रुपये ३९०/-**
- जलस्त्रोताशी समाजाचे असलेले आणि आता खंडीत झालेले नाते पुनश्च स्थापन करणारा दस्तऐवज.
- नाहीसे झालेले पाण्याचे पावित्र्य आणि नदीचे मातृत्त्व पुन्हा प्रस्थापित करणारा सांस्कृतिक वारसा.

**भारतीय जलसंस्कृती :**
**स्वरूप आणि व्याप्ती**

लेखक : आंतरराष्ट्रीय कीर्तीचे प्राध्यापक
**डॉ. रा.श्री. मोरवंचीकर**
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ - औरंगाबाद :
इतिहास आणि प्राचीन भारतीय संस्कृती विभागातील
सेवानिवृत्त प्राध्यापक

सुमेरू
**सुमेरू प्रकाशन**
डी-६, राजहंस, टिळकनगर, डोंबिवली (पू.) ४२१२०१
☎ : ०२५१ - २४०४१४१/२४३५९६८/०२४०-२३५१८७८

वगैरे मंडळी असतात ना, त्यांना सगळे पूर्ण माहीत असते, पण त्यांना ती माहिती परवडणारी नसते. कारण विकासाच्या त्यांच्या प्रारूपात याला जागा नसते. 'दि शेप ऑफ दि बेस्ट'च्या पानापानावर तिने यावर भाष्य केले आहे. त्यातले उतारे देणे हा त्याला 'पर्याय' नाही. आपण ते वाचायलाच हवे. आणि आपल्या ज्या भावंडांना इंग्रजी वाचनापर्यंत आपल्याला नेता आलेले नाही, त्यांच्यासाठी ते मराठीत यायला हवे. आणि ज्यांना त्या मराठीपर्यंतही अजून पोचता आलेले नाही त्या तिथपर्यंत आणण्यासाठी सगळे प्रयत्न करायला हवेत.

आता उपरोक्त वाचलेल्या ग्रंथांच्या यादीत एक विलक्षण वेगळा ग्रंथ आहे. 'चीप मोटेल्स ॲन्ड हॉट प्लेट' हा ग्रंथ आमचा मित्र नचिकेत याने अमेरिकेतून आणला. या अभ्यासू वाचनवेड्याने आई-वडिलांसोबत अमेरिकेत जाण्याची संधी घेतली आणि अधिकतर वेळात ग्रंथांच्या जगाचा प्रवास केला. येताना बॅगा भरून ग्रंथ आणले. त्याच्या अद्भुत ग्रंथयात्रेवर त्याने लिहावे यासाठी पाठपुरावा केला, पण अजून तरी प्रयत्नांना यश नाही. ग्रंथ आहे प्रवासाविषयीचा. मायकेल येटस् व्यवसायाने प्राध्यापक. त्याने बत्तीस वर्षे अर्थशास्त्र हा विषय विद्यापीठात शिकवला. शिकवतानाच त्याचे सामर्थ्य ध्यानात आलेच होते. मग संधी मिळताच या पती-पत्नीने स्थावर जंगमाची लावता येईल तशी व्यवस्था किंवा विल्हेवाट लावली आणि दोघांनी देश समजून घ्यावा यासाठी प्रवास केला. अडचणींवर मात करीत छोटे-मोठे कष्ट करीत ती जवळपास पाच वर्षे भटकली. त्या काळात त्यांनी पाहिलेला अमेरिकेचा समाज यात आलेला आहे. टूरिस्टांची ही अमेरिकन यात्रा नव्हे. आणखी काही वर्षातच आपणही त्यातून जाणार अशी चिन्हे आहेत. माणूस मुळात मार्क्सवादी असल्याने समाज कसा वाचावा याचे अभ्यासपूर्ण भान आणि या रुग्ण समाजाच्या आजारांचे त्यांचे वर्गीय विश्लेषण आपल्याही विकासप्रक्रियेच्या आणि लोकशाही व्यवहाराच्या पार्श्वभूमीवर पहावे असेच आहे. आपल्याकडे जाती, धर्म, वंशभेद तसेच तिथेही वंशभेद, वर्णभेद, स्वकीय-परकीय, विकासातून विस्थापित, प्रदूषण, निसर्गाचा विनाश हे सर्व आहेच. अमेरिकेचे हे गोंडस चित्र नाही. लेखकाच्या वर्गभानाची किनार या प्रवासाला आकडेवारीनिशी जोड देणारीच आहे.

योगायोग असा की सईद मिर्झाच्या 'अम्मी'तही सईद मिर्झाचा असाच देशविदेशातला डोळस प्रवास आहे. सईद मिर्झाला चित्रपटनिर्मितीचा अनुभव एका क्षणी उबग आणणारा वाटला. येटस्‌ला अर्थशास्त्र शिकवण्याचा. दोघेही संधी मिळताच त्यातून निसटले. सईद मिर्झाने भटकून आपल्या भटकंतीचे चित्रण केले. समाजजनांना बोलते


**अशीही ओळख...**
**पाण्यासंबंधीची पुस्तके प्रकाशित करणारी संस्था...**
**सुमेरू प्रकाशन - डोंबिवली**
**'पाणी' या समस्येशी निगडीत महत्त्वपूर्ण पुस्तके**

- **महाराष्ट्राचे जलनायक**
  लेखिका : सौ. सुरेखा शहा
  पृष्ठे : ३६० किंमत : रु. ३२०/-
- **पेटलेले पाणी... पेटणारे पाणी**
  लेखक : डॉ. अनिलराज जगदाळे
  पृष्ठे : १६० किंमत : रु. १४५/-
- **मध्ययुगीन जलसंधारण - जलव्यवस्थापन** (देवगिरी-दौलताबाद)
  लेखक : डॉ. रा.श्री. मोरवंचीकर
  अनुवाद : प्रदीप भलगे पृष्ठे : ७२ किंमत : रु. ७५/-
- **'जोहड' चे जलनायक डॉ. राजेंद्र सिंह**
  लेखिका : सौ. लीला शहा
  पृष्ठे : ६४ किंमत : रु. ५०/-
- **जोहड** (हिंदी आवृत्ती)
  लेखिका : सौ. सुरेखा शहा
  अनुवाद : बाळ ऊर्ध्वरेषे
  पृष्ठे : २३८ किंमत : रु. २६०/-
- याशिवाय गाजलेले जोहड आणि भारतीय जलसंस्कृती : स्वरूप आणि व्याप्ती हे जल विषयक ग्रंथ.

सुमेरू
**सुमेरू प्रकाशन**
डी-६, राजहंस, टिळकनगर, डोंबिवली (पू.) ४२१२०१
: ०२५१ - २४०४१४९/२४३५९६८/०२४०-२३५१८७८

केले. ते सगळेच मुळातून वाचायला हवे. ग्रंथाच्या अखेरीस 'The First Lady and the Terrorist' असे एक फिल्म स्क्रिप्टही आहे. अफगाणिस्तानातून परागंदा झालेला तरुण प्रा.रशिद आपल्या बहिणीच्या आसऱ्याला अमेरिकेत येतो. आणि त्याच काळात अमेरिकेतील ११ सप्टेंबरचे घातपाती हल्लाप्रकरण समोर येते. बहिणीच्या आसऱ्याने राहत असतानाच लिंडा या निग्रो तरुणीशी त्याचा परिचय होतो. सगळेच सांगत नाही. प्रेम तर आहेच, पण पेचही आहे. पेचही एकाच अंगाचा नाही तर त्यालाही विविध परिमाणे. माणसाचे माणूसपण हिरावून घेणारी. एल्ड्रिज क्लिव्हरचे आरंभीचे वाक्य आठवा. या फिल्म स्क्रिप्टचा शेवटचा संवाद फारच हादरवणारा.

Rasheed : Because if I stay longer, there is the distinct possibility that I will fall in love with you... Which will be disastrous!

Lida : Why?

Rasheed : It will destroy the greatest friendship in the world. आता हे किती अंगांनी आपल्यावर आदळते हे जाणून घेण्यासाठी आपण या ग्रंथाकडेच वळायला हवे. राजेश जोशी या हिंदीतल्या आजघडीच्या महत्त्वाच्या कवीची 'समरगाथा' जवळपास तीन वर्षांआधी वाचली होती. त्यात मास्टर मदन या तरुण वयातच– त्याचा कंठही फुटला नव्हता अशा वयात मारल्या गेलेल्या गायकासंदर्भात एक अशी ओळ होती. 'मास्टर मदन वह हमे गाने नहीं देते' आठवणीवर विसंबूनही ओळ देतो आहे कारण माझी 'समरगाथा'ची प्रत कुठेतरी हस्तांतरित झाले आहे. असो.

आपले हरवलेले आणि खरे तर 'हिरावलेले' माणूसपण मिळवताना खूप कष्ट पडणार आहेत. सईद मिर्झा, मायकेल येटस्, अरुंधती राय आणि आपण सगळेच ज्या बाजूचे आहोत त्या बाजूने पाय रोवून ठाम उभे आहोत. काही बाबी संदिग्ध आहेत. पण याहून सुंदर पर्यायी जगाची आपली लढाई आपण सोडलेली नाही. अरुंधती राय तिच्या उपरोक्त मुलाखतींच्या ग्रंथात म्हणत आहे... We as human beings must never stop that quest. Never. Regardless of Bush or Churchill of Mussolini or Hitler, whoever else. We can't ever abandon our personal quest for joy and beauty and gentleness. Wf course weare allowed moments of dispair. We would be inhuman if we weren't, but let it never be said that we gave up. (The shape of the Beast; Viking/Penguin 2008 : page 67).

**सतीश काळसेकर**

'कबीरा', चित्रकुटी कलाग्राम, मु.पो.आंबेघर,
ता.पेण, जि. रायगड ४०२ १०७
मोबा. : 9422689559

**शाकाहार**

**जैनांचा राष्ट्रीय स्तरावरील मानबिंदू**
..... त्याला मक्तेदारीही म्हणायला हरकत नाही. अशा शाकाहारी पदार्थांची रेसिपी सांगणारे 'चवदार' पुस्तक

स्वादिष्ट संतुलित आणि सात्त्विक शाकाहारी
**अन्नब्रह्म**
लेखिका : सौ. लीला शहा

**खरे तर शाकाहाराच्या माध्यमातून अहिंसेचा प्रसार होतो आहे.**

अशा विविध प्रांतातील निरनिराळया शाकाहारी पदार्थांची क्रियासहित माहिती.
आमट्या, कढी, भाज्या, उसळी, मेतकूट, डांगर, पिठले, डोसे, घिरडी, घावन, आंबोळया, ढोकळयांचे अनेक प्रकार, कोशिंबीर, रायती, भरीते इ.

इडल्या, आप्पे, गुळमांगडू आणि लोणची, तक्कू, छुंदा, बर्फी व वड्यांचे प्रकार, लाडू इ. प्रकार.

जैन गृहिणींना नितांत आवश्यक असे स्वयंपाक घरासाठी उपयुक्त पुस्तक.

**पाने : १३६ किंमत : १२०/- रुपये**
**अत्यंत कल्पक, आकर्षक कव्हर**
**रजिस्टर पोस्टेज खर्च रु. २०/-**

एकूण १४० रु. ची मनी ऑर्डर किंवा
डी.डी. पाठवा

सुमेरू
**सुमेरू प्रकाशन**
डी-६, राजहंस, टिळकनगर, डोंबिवली (पू.) ४२१२०१
: ०२५१ - २४०४१४१/२४३५१६८/०२४०-२३५१८७८

सुभाष
भेण्डे

# कवींचा कवी

विंदांनी २३ ऑगस्ट रोजी वयाची नव्वद वर्षे पूर्ण केली.

कोल्हापूरला इंग्रजी पाचवीत असताना विंदा करंदीकर कविता लिहायला लागले. खिशात मावण्याएवढ्या छोट्या वहीत काही स्फुट कविता त्यांनी लिहिल्या होत्या. एका कवितेत त्यांनी लिहिलं होतं; 'गरीब बिचारा शेतकरी । करी शिळी चत्कोर भाकरी । घेउनि मेरेवरी बैसला । अश्रू ढाळीत ।'

कोवळ्या वयात प्रगट झालेली ही सामाजिक जाणीव त्यांच्यानंतरच्या काव्यलेखनातून सतत प्रगट झालेली दिसते. 'मृदगंध' या त्यांच्या दुसऱ्या काव्यसंग्रहातील 'माझ्या मना बन दगड' या गाजलेल्या कवितेत ते म्हणतात..

*हा रस्ता अटळ आहे!*
*अन्नाशिवाय, कपड्याशिवाय,*
*ज्ञानाशिवाय, मानाशिवाय,*
*कुडकुडणारे हे जीव*
*पाहू नको! डोळे शीव!*
*नको पाहू जिणे भकास;*
*ऐन रात्री होतील भास;*
*छातीमध्ये अडेल श्वास,*
*विसर त्याना, दाब कढ;*
*माझ्या मना बन दगड!*

सामाजिक जाणीवेचे अधिक संमिश्र स्वरूप 'यंत्रावतार', 'ती जनता अमर आहे' या कवितांमध्ये आहे. 'तेच ते' सारखी विनोदगर्भ उपहासिका किंवा 'धृपद' संग्रहातील 'आततायी अभंगा'सारख्या उपहासगर्भ कविताही या सामाजिक जाणीवेचीच अधिक प्रगत अवस्था. विंदांची कविता म्हणजे शंभर नंबरी सोने. परंपरा आणि नवता यांची सुरेख सांधेजोड त्यांच्या काव्यरचनेत दिसते. त्यांच्या कवितेत जाणवणारा जोश, विमुक्तपणा, अवखळपणा, मिस्किलपणा तिचा स्वत:चा आहे. 'उथळ व उठवळ' असे त्यांनी काही लिहिले नाही. स्वत:च्या निर्मितीकडे कठोरपणे, अलिप्तपणे पाहून जे कमी दर्जाचे वाटले ते त्यांनी बाजूला ठेवले. 'विरुपिका', 'तारुचित्रे', 'मुक्त सुनीते' यांसारखे वैशिष्ट्यपूर्ण काव्यप्रकार त्यांनी निर्माण केले. अन्य कवींनी रूढ केलेले अभिव्यक्तीचे प्रकार यशस्वीपणे वापरून झाल्यावर विंदांनी 'अजिबात वेगळे अनुभव, अजिबात वेगळी हत्यारे' यांचा स्वतंत्र शोध घेतला. त्यांच्या कवितेने 'रिस्क' घ्यायला कधी मागे-पुढे पाहिले नाही, उडी मारताना ती पेलेल की नाही याचा सावध हिशेब कधी केला नाही. 'प्रयोगशील अपयशाला सराईत यशापेक्षा अधिक तेज असते' ही खूणगाठ सदैव मनाशी बाळगली.

विंदांचे मोठेपण असे की १९८१ साली 'विरुपिका' हा पाचवा संग्रह असताना त्यांनी काव्यक्षेत्रातील निवृत्तीबाबत घोषणा केली. त्यांनी नमूद केले, 'कवीप्रमाणेच कवीची प्रतिभाही मर्त्य असते... कधी तो आधी जातो, कधी ती आधी जाते.' पस्तीसएक वर्षे एका मस्तीत काव्यनिर्मिती करणाऱ्या विंदांना प्रकर्षाने वाटू लागले, 'काव्याच्या क्षेत्रात माझ्या हातून थोडंफार होण्यासारखं आहे ते होऊन गेलं, आजवर जे लिहिलं त्याहून अर्थवाही मूल्यगर्भ जे मलाच केले पाहिजे असं माझ्या हातून काहीही होईल असं मला वाटत नाही.' तेव्हा त्यांनी शांतपणे लेखणी खाली ठेवली. कसलेही मोठे आकर्षण, कसलाही जबरदस्त मोह त्यांना त्यांच्या या निश्चयापासून परावृत्त करू शकला नाही. अपवाद चार वर्षांपूर्वी प्रकाशित असलेल्या 'अष्टदर्शने' या छोट्या पुस्तकाचा. मराठी वाचकांना देकार्त, स्पिनोझा, काण्ट, हेगेल, शोपेनहौएर, नित्से आणि बर्गसा या सात पाश्चात्य आणि चार्वाक या भारतीय तत्त्वज्ञाची आणि त्यांच्या विचारांची ओळख करून देण्याच्या हेतूने विंदांनी 'अभंग' रचनाप्रकाराचा अवलंब करून 'अष्टदर्शने' निर्मिले. आशयदृष्ट्या सखोल असा हा उपक्रम.

विंदांसारखे मोठे कवी वाचकसापेक्ष व समूहसापेक्ष अशा दोन्ही यशाची सारखीच कदर करत असल्याने मराठी कविता सर्वसामान्य श्रोत्यांपर्यंत पोचली. विजया राजाध्यक्षांना दिलेल्या प्रदीर्घ मुलाखतीत ते म्हणतात, 'काव्य वाचकांपर्यंत पोचवण्याचा मार्ग म्हणजे कविता मासिकात छापणे, पण संपादकाचा काही भरवंसा नसतो. 'स्वेदगंगा' ही माझी सुरुवातीची एक गाजलेली कवितात ती मार्क्सिस्ट आहे या सबबीखाली 'किर्लोस्कर'ने परत पाठविली होती. दुसरं उदाहरण 'दातापासून दाताकडे' या पुढील प्रगत अवस्थेत लिहिलेल्या कवितेचं, ती 'सत्यकथे'कडून परत आली! आपली नवी कविता मासिकांमार्फत लोकांपर्यंत पोहोचेलच असा विश्वास या अनुभवांमुळे नव्हता!' काव्यवाचनाद्वारे लोकांपर्यंत कविता पोचवण्याचा वसा त्यांनी, पाडगावकर आणि बापट यांनी घेतला. महाराष्ट्रातील दूरदूरच्या खेडोपाडी, शहरात त्यांनी आपल्या कविता पोचवल्या आणि मराठी समाजात सांस्कृतिक चैतन्य निर्माण करण्याच्या कामी फार मोठं योगदान केलं.

'ज्ञानपीठ' हा विंदांना मिळालेल्या असंख्य पुरस्कारांचा परमोच्च बिंदू. त्यापूर्वी त्यांना लाख, दीड लाख रुपयांचे पुरस्कार मिळाले. त्या सर्व रकमा त्यांनी शांतपणे, गाजावाजा न करता सेवाभावी संस्थांना, भूकंपग्रस्तांना वाटून टाकल्या. उत्कृष्ट अनुवादाचे पारितोषिक बाळशास्त्री जांभेकर यांच्या नावाने ठेवले. मराठी लेखकाने एकतरी पुस्तक अनुवादित करून मराठीत आणायला हवे असे 'फाऊस्ट', 'किंग लियर' या ग्रंथांचे अनुवाद करणाऱ्या विंदांना मनापासून वाटते.

विंदा 'ज्ञाता दशसहस्त्रेषु' नव्हे, दशलक्षेषु आहे, असे वसंत बापट यांनी म्हटले आहे. बापट पुढे म्हणतात, 'आपल्या जीवनात तो कधी सरपटला नाही, बुळबुळीत अंगात निसटला नाही, स्वार्थानं चळला नाही आणि भयानं थरथरला नाही.' विंदा नऊ दशके आपला आब राखून जगले. ते शतायु होवोत अशी प्रार्थना प्रत्येक मराठी माणूस करील.

**सुभाष भेण्डे**
५ ज्ञानदेवी, साहित्य सहवास, वांद्रे (पूर्व), मुंबई ४०००५१
दूरध्वनी : 022-26591603

# मुक्काम कोलकाता

निखिल शाळिग्राम

## एक आगळीवेगळी बँक, एक नवी 'उषा'

बँका, सहकारी पतपेढ्या सर्वत्र पोचलेल्या आहेत. खेडोपाड्यात, दुर्गम प्रदेशात तर केवळ कामगारांनी तसेच स्त्रियांनी सहकारी तत्त्वावर चालविलेल्या बँकाही आता नवीन राहिल्या नाहीत. पण कोलकात्यातली एक बँक मात्र आगळी-वेगळी आहे. तिचे नाव आहे 'उषा सहकारी बहुउद्देशीय संस्था मर्यादित लि.,' ही सहकारी बँक वेश्या व्यवसायातील स्त्रिया चालवतात. तिची २००७-८ ची उलाढाल जवळपास दहा कोटी रुपये आहे. या बँकेचे सदस्यत्व वेश्या व्यवसायापुरतेच मर्यादित असून त्यांची सदस्यसंख्या आहे ८५६७. विशेष म्हणजे या बँकेच्या व्यवस्थापन मंडळावरचे बारा सभासद, कोलकात्याच्या सोनागाछी या देशातील सर्वात मोठ्या वेश्यावस्तींपैकी एक असलेल्या विभागातले आहेत. या सहकारी बँकेत खाते उघडण्यासाठी इतकी झुंबड उडतेय, की बँकेच्या व्यवस्थापन मंडळाने प.बंगाल राज्याच्या मुर्शिदाबाद, हुगळी या जिल्ह्यांत आणि उत्तर बंगालमधील अन्य वेश्या वस्तीच्या विभागात सहा शाखा उघडण्याचे ठरवले आहे.

येथील वेश्या वस्तीतील महिलांना स्वत:चे बँकेचे खाते उघडण्याची इतकी उत्कंठा लागण्याचे कारण आजवर त्यांना इतर बँकात बचत खाते सुरू करण्यास मज्जाव केला जात असे. त्या तिथे गेल्या, तर त्यांची हेटाळणी केली जात होती. या संदर्भात उषा सहकारी बँकेच्या अध्यक्ष प्रतिमा दास म्हणतात, या बँकेने माझ्या कुटुंबाचे रक्षण केले आहे. मीदेखील राष्ट्रीयकृत बँकेत बचत खाते चालू करण्यासाठी गेले होते. पण मला त्यांनी शिधापत्रिका, मतदार ओळखपत्र आणि पत्त्याचा पुरावा सिद्ध करणारे अनेक कागदपत्रे मागितले. माझी शिधापत्रिका व मतदार ओळखपत्र ही सारी कागदपत्रे माझ्या मुर्शिदाबादमधील मूळच्या घरी होती. मी ती आणू न शकल्यामुळे मला आजपर्यंत खातेच उघडता आले नव्हते. याशिवाय त्या बँकांमधील वातावरण आपुलकी, स्नेह निर्माण करणारे नव्हते. तिथले बाबू लोक आमच्याकडे वेगळ्याच नजरेने पहात आणि आमच्यासारख्या महिलांना लाजीरवाणे होऊन जायचे.'

श्रीमती दास पुढे म्हणाल्या, 'आमच्यापाशी अडीअडचणीच्या प्रसंगी पैसा नसतो. आजरपण येते, किंवा रुग्णालयात भरती होण्याची पाळी ओढवते, तेव्हा आम्हाला स्थानिक सावकाराचे पाय धरावे लागतात. तो तर आमच्याकडून १०० टक्के व्याज वसूल करतो.'

१९९५ मध्ये या सर्व वेश्यांनी स्वत:ची अशी बँक स्थापन केली. जो काही पै-पैसा या बँकेत जमा करण्यात येतो, त्याचे बहुतांशी व्यवस्थापनही याच महिला करतात.

या बँकेचे अकाउंटंट आहेत श्री.शंतनू भट्टाचार्य. ते म्हणाले, 'की बँकेतील पुरुष कर्मचाऱ्यांपैकी मी एक पुरुष आहे. साधारणपणे एका महिलेला महिन्याभरात दहा रुपयांपासून ते दहा हजार रुपयांपर्यंत बचत करणे शक्य असते. त्यांच्या बचतीप्रमाणे त्यांना कर्जाचे वाटप करण्यात येते. या कर्जाची रक्कम पाचशे रुपयांपासून ते अगदी दहा लाखापर्यंत जाते.

## विज्ञानशिक्षणाचा वर्ग शाळेच्या भिंतींबाहेर

मोहम्मद रफीक, वय वर्षे ४९. रफीकमिया गेले काही महिने आपल्या राजाबझारमधील घराजवळ समाजाच्या उपेक्षित वर्गातील मुलांसाठी विज्ञानाचा खास वर्ग घेत आहेत. दररोज सकाळी दोन तास झाकीर हुसेन अकादमी आणि आरोग्य केंद्रात ते चाळीस एक मुलांना इंग्लिश व उर्दू शिकवतात. पाच ते दहा वर्षांची ही मुले आहेत. रफीकमियांच्या नक्की अख्तर या व्यापारी मित्राने दिलेल्या २५० चौरस फुटांच्या जागेत हा वर्ग चालतो. या वर्गात येणारी काही मुले शाळेत नियमाने जाणारी आहेत, तर काहींना घरातील आर्थिक अडचणींपायी शाळा सोडावी लागलेली आहे. संध्याकाळी नववी व दहावीच्या विद्यार्थ्यांना अभ्यासक्रम शिकवला जातो. बहुतांश विद्यार्थी वर्गाची फी भरू शकत नाहीत. जे काही देऊ शकतात, त्यांच्याकडून नाममात्र पन्नास रुपये घेण्यात येतात. या वर्गाचे बहुतेक शिक्षकही पैसे घेत नाहीत. हे वर्ग चालवण्याचा खर्च (म्हणजे वीज आणि स्टेशनरी इत्यादी) अंदाजे महिन्याकाठी पाच हजार येतो. यापैकी बराचसा खर्च अख्तरसाहेबांच्या खिशातून होतो. रफीकमिया निधी गोळा करून आणतात, तर काही वेळा स्वत: हातभार लावतात.

'मी वयाच्या सतराव्या वर्षापासून शिक्षण घेऊ लागलो. शाळेची फी देणं अशक्य होतं, कारण माझ्या वडिलांचं मी लहान असतानाच निधन झालं होतं. मी एका छापखान्यात काम करून कुटुंबाचा सांभाळ करत होतो. पण मग शिकण्यासाठी वेळ हवा म्हणून विड्या वळण्याचं काम पत्करलं.' रफीकमिया सांगतात.

रफीकमियांनी १९९३ मध्ये उर्दू विषय घेऊन कलकत्ता विद्यापीठाची एम.ए. पदवी संपादन केली. आज ते विद्यापीठाच्या अंडर ग्रॅज्युएट कौन्सिलचे वरिष्ठ सहाय्यक आहेत. नोकरीच्या वेळाशिवाय ते या वर्गाची जबाबदारी घेऊ लागले. त्यांनी या विभागातील घराघरात जाऊन तेथील पालकांना या वर्गासाठी आपली मुले पाठवण्याला उद्युक्त केले. बहुतेक पालकांना आपली मुले शिकावीत. असे वाटत होते, पण त्याबरोबर कुटुंबाचा सांभाळही गरजेचा होता. त्यात सारे पालक स्वत:च अशिक्षित असल्यामुळे त्यांना या वर्गाची कल्पना पटवणे रफीकमियांना खूप जड गेले, पण त्यांनी स्वत:चं उदाहरण देऊन या वर्गाचं महत्त्व सांगितलं.

'आता यापुढे अकरावी आणि बारावीच्या शाळा सोडलेल्या मुलांसाठी रात्रीचे वर्ग सुरू करण्याची योजना आहे' रफीकमिया यांचे हे आत्मविश्वासाचे बोल आहेत.

**निखिल शाळिग्राम**

११७, दुर्गाप्रसाद, हाजरा रोड, कोलकाता ७०००५.

इ-मेल : nikheel.shaligram@gmail.com

साहित्य परिचय

# 'आपट्याचं पान' – चरित्रात्मक कादंबरी आणि राजकीय व सामाजिक जीवनाचा आलेख

**ग. प्र. प्रधान**

भारताच्या स्वातंत्र्यसंग्रामामध्ये लोकमान्य टिळकांच्या काळापासून ते गांधीजींच्या नेतृत्वाखाली स्वातंत्र्य मिळेपर्यंत अहमदनगर हे एक महत्त्वाचे केंद्र होते. जानकीबाई आपटे यांनी १९३० साली स्वातंत्र्यलढ्यात भाग घेतला. त्या झुंजार स्वातंत्र्यसैनिक आणि असामान्य विधायक कार्यकर्त्या होत्या. जानकीबाई आपटे यांचे चरित्र त्यांचे चिरंजीव श्री.भालचंद्र प. आपटे यांनी लिहिले असून मी ते वाचले आहे. १९४२ सालापासून मी जानकीबाईंना ओळखत होतो. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर १९५४ पर्यंत त्यांनी केलेले विधायक काम मी जवळून पाहिले आहे. जानकीबाईंच्या जीवनावर डॉ.अरुण मांडे यांनी प्रदीर्घ ६४३ पृष्ठांची चरित्रात्मक कादंबरी लिहिली आहे. ती कादंबरी वाचल्यावर तिचा थोडक्यात परिचय करून दिल्यास अनेक वाचक ती वाचतील असे वाटल्यामुळेच मी हा लेख लिहीत आहे.

जानकीबाई आपटे यांच्या जीवनावरील या कादंबरीला, लेखक डॉ.अरुण मांडे यांनी 'आपट्याचं पान' हे कादंबरीच्या आशयाला अनुरूप असे शीर्षक दिलेले आहे. कादंबरीच्या प्रस्तावनेत डॉ.र.बा.मंचरकर या थोर समीक्षकांनी लिहिल्याप्रमाणे 'आपट्याचं पान' ही गांधीयुगाच्या चैतन्याने भारलेली आणि ध्येयवादाच्या स्फुरणाने तेजोमय झालेली कादंबरी आहे.'

जानकीबाईंचा जन्म एका गरीब ब्राह्मण कुटुंबात झाला. दहाव्या वर्षी त्यांचे लग्न झाले. त्यांना पाच मुले झाली. शिवणकाम करीत त्यांनी स्वत:चा गरिबीचा संसार सावरला. तीस वर्षापर्यंतचे त्यांचे आयुष्य संसार करणाऱ्या गृहिणी म्हणूनच गेले. परंतु देशातील राजकीय वातावरणात त्यांच्या मनात देशसेवेची ठिणगी पडली आणि त्यांचे सर्व जीवनच बदलून गेले. ३१ डिसेंबर १९२९ रोजी लाहोर येथे पं.जवाहरलाल नेहरू यांच्या अध्यक्षतेखाली भरलेल्या काँग्रेसच्या अधिवेशनात संपूर्ण स्वातंत्र्याचा ठराव एकमताने मंजूर झाला आणि त्यानंतर पं.नेहरूंनी २६ जानेवारी हा दिवस स्वातंत्र्यदिन म्हणून साजरा करण्याचे सर्व भारतीयांना आवाहन केले. त्याप्रमाणे २६ जानेवारी १९३० रोजी अहमदनगर येथे झेंडावंदन आणि जाहीर सभेचा कार्यक्रम आयोजित केलेला होता. त्या सभेत कमलादेवी चट्टोपाध्याय यांचे अत्यंत स्फूर्तिदायी भाषण झाले. त्या म्हणाल्या, 'स्त्रियांनी आता चार भिंतीच्या बाहेर पडले पाहिजे' कमलादेवींच्या त्या शब्दांनी जानकीबाईंच्या मनावर विलक्षण परिणाम झाला. रावसाहेब आणि अच्युतराव या पटवर्धन बंधूंच्यामुळे त्या म.गांधींच्या विचाराकडे आणि स्वातंत्र्य चळवळीकडे आकृष्ट झाल्या आणि तोपर्यंत गृहिणी म्हणून संसार करणाऱ्या जानकीबाईंचे जीवनच आमूलाग्र बदलून गेले. त्या स्वातंत्र्यलढ्यात सामील झाल्या.

**डॉ.अरुण मांडे यांनी 'आपट्याचं पान' या चरित्रात्मक कांदबरीमध्ये जानकीबाई आपटे यांचे कार्य हा केंद्रबिंदू ठेवला आहे आणि त्याचवेळी तत्कालीन राजकीय आणि सामाजिक परिस्थितीचेही सुस्पष्ट चित्र रेखाटले आहे. १९३० ते १९५४ या कालखंडातील अहमदनगरमधील महाराष्ट्रातील आणि भारतातीलही वातावरणाच्या पार्श्वभूमीवर जानकीबाईंची व्यक्तिरेखा फार उठावदार झाली आहे. डॉ.मांडे यांची शैली कादंबरीच्या आशयाला अनुरूप आहे. एक चरित्रात्मक कादंबरी आणि एक राजकीय-सामाजिक जीवनाचा आलेख असे 'आपट्याचं पान'चा पुस्तकाचे स्वरूप आहे आणि ते अतिशय हृद्य आहे.**

या कादंबरीमध्ये लेखकाने पूर्वार्धात १९३०-३२ सालच्या स्वातंत्र्य चळवळीचे चित्र अत्यंत प्रभावीपणे रेखाटले आहे. लाठीमार, गोळीबार असे ब्रिटिशांचे अत्याचार, त्या अत्याचारांना निर्भयपणे तोंड देणारे नेते व त्यांचे अनुयायी, हे सर्व रोमहर्षक वर्णन वाचताना वाचकाला स्वातंत्र्य लढ्याच्या त्या कालखंडाचे वास्तव दर्शन होते. सत्याग्रहींचे धीरोदात्त वागणे, बायकांनी आणि मुलांनीही त्यांना दिलेली साथ, प्रभातफेऱ्या, दारूच्या दुकानावरचे पिकेटिंग, गुप्तपणे बुलेटिन छापणे व वाटणे हा सारा तपशील लेखकाने अत्यंत चित्तवेधकपणे सांगितला आहे. मुख्यत: जानकीबाई आपटे यांच्या कार्याचे वर्णन करून स्वातंत्र्य लढ्यामध्ये सामान्यांचे असामान्यत्व कसे प्रगट झाले याचे या कादंबरीत डॉ.मांडे यांनी अत्यंत हृदयस्पर्शी चित्रण केले आहे.

जानकीबाईंचे पती तात्या हे एक अगदी सामान्य गृहस्थ होते. जानकीबाईंच्या तुलनेत तर ते कर्तृत्वशून्य वाटतात, परंतु ते मनाने फार मोठे होते. जानकीबाईंचे गुण, त्यांचे कर्तृत्व यांचा तात्यांना अभिमान वाटे. तात्या आणि जानकीबाई यांच्या

---

**'आपट्याचं पान'**
**लेखक : डॉ. अरुण विनायक मांडे**
प्रकाशक : श्री. विद्या प्रकाशन, पुणे ३०
किंमत : ६००/- रुपये

स्वभावात फरक असला तरी त्यांची मने एकमेकांना जुळलेली, मिळालेली होती. डॉ.अरुण मांडे यांनी या कादंबरीत तात्यांच्या टिपणवहीचा निवेदनाचे माध्यम म्हणून फार कौशल्याने उपयोग केलेला आहे. या टिपणवहीतील टिपणांमधून तात्यांचे साधेसुधे व्यक्तिमत्त्व प्रगट होते आणि जानकीबाईंच्या तेजस्वी व्यक्तिमत्त्वावरही प्रकाश पडतो. जानकीबाई स्वातंत्र्य चळवळीत आणि समाजात काम करू लागल्या. त्यावेळी तात्यांनी त्यांचा कधीही तेजोभंग केला नाही. जानकीबाईंना जे काम करायचे होते ते करण्यास तात्यांनी त्यांना मुभा दिली, इतकेच नाही तर त्यांना पाठिंबाही दिला. टिपणवहीत तात्यांनी जानकीबाईंचे जिव्हाळ्याने वर्णन केले आहे. या वर्णनातून तात्यांच्या आणि जानकीबाईंच्या भावजीवनाची आपल्याला कल्पना येते.

जानकीबाई आपटे यांच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास कसा होत गेला, म.गांधींचे विचार त्यांनी कसे आत्मसात केले, भोवतालच्या परिस्थितीचे त्यांचे आकलन कसे परिपक्व होत गेले हे डॉ.मांडे यांनी अनेक प्रसंगांतून दाखविले आहे. जानकीबाईंच्या मनात एखादा विचार निश्चित झाला की भोवतालच्या स्त्रियांना बरोबर घेऊन त्या विचाराची कार्यवाही करावयाची अशी त्यांची कार्यपद्धती होती. त्या संघटनेचे महत्त्व जाणत आणि अत्यंत कुशलतेने संघटना आणि संस्था उभ्या करीत. त्यांना असे मनोमन वाटले की नगरमधील भगिनींची एक संस्था असली पाहिजे. त्यांनी हा विचार त्यांच्या सहकारी सुशिलाबाई यांच्याजवळ बोलून दाखविला. या संस्थेत जाती, धर्म अशी बंधने न ठेवता सर्व स्त्रियांना घ्यावयाचे हा विचार जानकीबाईंनी मांडला. तेव्हा सुशिलाबाई म्हणाल्या, ‘आपल्या बायकांना पटेल का हा विचार?’ यावर जानकीबाई म्हणाल्या, ‘तुम्हाला पटतो ना हा विचार? मग आपण दोघी सुरुवात करू.’ आपला विचार आपण इतरांना पटवून देऊ शकू असा आत्मविश्वास जानकीबाईंना होता. आपण स्वत:च्या विचारांप्रमाणे वागू लागलो की इतरांना तो हळूहळू पटू लागतो असे जानकीबाईंना वाटे. हिंद सेविका समाज ही संस्था स्थापन करण्याच्या त्यांच्या निर्णयातून हे समजून येते. जात, धर्म न पाळता सर्व स्त्रियांना या संस्थेत प्रवेश द्यायचा, हा जानकीबाईंचा विचार त्या काळात अपूर्वच होता. संस्थेचे नाव जानकीबाईंनी कसे सुचविले हेही या संभाषणातून आपल्याला समजते.

जानकीबाईंच्या मनावर म.गांधींच्या शिकवणुकीचा फार खोलवर परिणाम झाला. त्या ‘वैतागवाडी’ या हरिजन वस्तीत जाऊन काम करू लागल्या. या कामाबद्दल रावसाहेब पटवर्धन यांनी गौरवोद्‌गार काढले होते. काही प्रसंग वाचताना जानकीबाईंच्या धैर्याचे आपल्याला आश्चर्य वाटते.

जानकीबाई वैतागवाडीत गेल्या असताना एका घरासमोर प्रेत तिरडीवर ठेवलेले होते. तीन माणसे खांदा देण्यासाठी आली होती, परंतु ती मृत व्यक्ती मातंग असल्यामुळे बाकीचे लोक बाजूला उभे होते. जानकीबाईंनी हे ऐकल्यावर त्या संतापून म्हणाल्या, ‘मेलेल्या माणसाची कसली आली आहे जात-पात? कोणी येत नसेल तर मी खांदा द्यायला येते.’ असे म्हणून त्या पुढे सरसावल्या तेव्हा एकजण पुढे आला आणि म्हणाला, ‘बाई, मी खांदा देतो.’ या प्रसंगाचे अगदी साधे सरळ वर्णन डॉ.मांडे यांनी केले आहे आणि त्यातूनच जानकीबाईंची खरी ओळख होते. जानकीबाई आपटे यांनी दलित आणि मुस्लिम स्त्रियांमध्ये आपुलकी निर्माण करून त्यांचेही सहकार्य विधायक कामामध्ये मिळविले. वैतागवाडीत हरिजन मुलींना गोळा करून त्यांच्या डोक्यातील उवा काढणाऱ्या जानकीबाईंनी तेथे शाळा कशी सुरू केली याचे फार सुंदर चित्रण लेखकाने केलेले आहे.

जानकीबाई वैयक्तिक सत्याग्रहात येरवडा तुरुंगात असताना तेथे त्यांना फातिमा तय्यबजी भेटल्या. तुरुंगातील या दोघींच्या भेटीचे वर्णन बहारीचे आहे.

१९४२ च्या चळवळीतील अनेक प्रसंगांचे डॉ.मांडे यांनी जे वर्णन केले आहे त्यातून त्या कालखंडाचे स्वरूप वाचकाला समजून येते. अशा वादळी कालखंडामध्ये जानकीबाई किती निर्धाराने आणि धैर्याने वागल्या हेही डॉ.मांडे यांनी चित्रीत केले आहे.

२३ नोव्हेंबर १९४३ ला हिंद सेविका संघाच्या बालिकाश्रमाच्या इमारतीच्या उद्‌घाटनासाठी हरिजन सेवक संघाचे अध्यक्ष थोर गांधीवादी ठक्करबाप्पा हे आले होते, त्या प्रसंगाचे तिसाव्या प्रकरणातील वर्णन बहारीचे आहे.

म.गांधींच्या हत्येनंतर नगरमध्ये तणावाचे वातावरण होते. सात दिवसांनी कर्फ्यू उठल्यावर रावसाहेब पटवर्धन आणि अन्य नेत्यांनी मूक मिरवणूक काढली. त्यावेळी प्रकृती बरी नसतानाही जानकीबाई मिरवणुकीत सामील झाल्या. साने गुरुजींनी ज्यावेळी जानकीबाईंनी चालविलेल्या बालिकाश्रमास भेट दिली त्यावेळी साने गुरुजींनी लिहिलेला अभिप्राय डॉ.मांडे यांनी शब्दश: उद्‌धृत केला आहे. जानकीबाईंना ज्या कठीण प्रसंगातून जावे लागले त्यांचीही डॉ.मांडे यांनी सुव्यवस्थित मांडणी केली आहे. उपसंहार या प्रकरणात जानकीबाईंच्या निधन प्रसंगाचे जे रेखीव वर्णन आहे ते वाचताना डोळे पाणावतात.

डॉ.अरुण मांडे यांनी ‘आपट्याचं पान’ या चरित्रात्मक कांदबरीमध्ये जानकीबाई आपटे यांचे कार्य हा केंद्रबिंदू ठेवला आहे आणि त्याचवेळी तत्कालीन राजकीय आणि सामाजिक परिस्थितीचेही सुस्पष्ट चित्र रेखाटले आहे. १९३० ते १९५४ या कालखंडातील अहमदनगरमधील महाराष्ट्रातील आणि भारतातीलही वातावरणाच्या पार्श्वभूमीवर जानकीबाईंची व्यक्तिरेखा फार उठावदार झाली आहे. डॉ.मांडे यांची शैली कादंबरीच्या आशयाला अनुरूप आहे. एक चरित्रात्मक कादंबरी आणि एक राजकीय-सामाजिक जीवनाचा आलेख असे ‘आपट्याचं पान’चा पुस्तकाचे स्वरूप आहे आणि ते अतिशय हृद्य आहे.

**ग. प्र. प्रधान**

महाराष्ट्र आरोग्य मंडळ, माळवाडी,
हडपसर, पुणे ४११ ०२८.

# गाव आणि शाळा

## मुक्ता दाभोलकर

**शिक्षणातील गळतीची अनेक कारणे असतील, त्यापैकी मुलांना शाळा निरस वाटते हे एक महत्त्वाचे कारण आहे. हे कारण लक्षात घेऊन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामध्ये शिक्षणासंबंधी काही महत्त्वाची तत्त्वे नमूद करण्यात आली आहेत. दैनंदिन अध्ययन, अध्यापन हे बालकेंद्री, कृषिप्रधान, आनंददायी असावे अशी अपेक्षा त्यात व्यक्त केलेली आहे. या दृष्टिकोनावर आधारित शिक्षण प्रशिक्षणेही गेली काही वर्षे मोठ्या प्रमाणात होत आहेत. परंतु बहुतांश शाळांमध्ये शिकविण्याच्या पद्धतीत या दृष्टिकोनाचा अंतर्भाव घडून काही बदल झाल्याचे दिसत नाही.**

शिक्षणाची दुरावस्था सर्वजण जाणतात. विविध व्यक्ती, संस्था, संघटना ही अवस्था बदलण्यासाठी आपापल्या कार्यक्षेत्रात, स्वत:ला उपलब्ध असलेल्या शक्यतांनुसार काम करतात, प्रकल्प राबवितात. परंतु सघन काम करण्याचे संस्थेने थांबविले की गावातील बदलांची गती मंदावते असा बहुतेकांचा अनुभव आहे. या पार्श्वभूमीवर नागरिकांनी लोकशाही विकेंद्रीकरणाच्या प्रक्रियेतून मिळालेले अधिकार स्वत:च्या आयुष्याचे चित्र बदलण्यासाठी वापरण्याचे महत्त्व अधिकच अधोरेखित होते. गावाच्या शिक्षणाशी निगडीत प्रश्नांची उत्तरे शोधण्यासाठी सर्वसामान्य ग्रामस्थाला ग्रामशिक्षण समितीच्या रूपाने परिस्थितीत हस्तक्षेप करण्याचा अधिकार मिळालेला आहे.

१९९१ साली ग्रामशिक्षण समितीला अधिकार देणारा शासननिर्णय अस्तित्वात आला. २००१ साली त्यात सुधारणा करण्यात आली. परंतु ज्यात आपले अधिकार व कर्तव्ये याविषयी मुद्देसूद मांडणी करण्यात आलेली आहे अशा या शासननिर्णयाची माहिती ग्रामशिक्षण समिती सदस्यांना नसते. वास्तविक पाहता ग्रामशिक्षण समिती ही ग्रामपंचायत स्तरावरील विषय समित्यांपेक्षा अधिक अधिकार असलेली एक शासनमान्य समिती आहे. हे अधिकार व अधिकाराच्याच नाण्याची दुसरी बाजू असलेली कर्तव्ये जाणून घेऊन ग्रामशिक्षण समित्या कार्यक्षम झाल्या तर शैक्षणिक चित्र पालटण्याची मोठी शक्यता यात दडलेली आहे.

आज ६ ते १४ या वयोगटातील ५०% पेक्षा अधिक मुले सक्तीचे म्हणवले जाणारे आठ वर्षांचे प्राथमिक शिक्षणदेखील घेण्याआधी गळताहेत. मूलभूत कौशल्येदेखील प्राप्त न झालेली, शिक्षणाने ज्यांचे अंतरंग जराही उजळलेले नाहीत अशी लक्षावधी मुले समाजात आहेत. १८३५ साली मेकॉलेने तयार केलेल्या शिक्षणनीतीमध्ये ब्रिटिश सरकारला सरकार चालविण्यासाठी आवश्यक तेवढे मनुष्यबळ निर्माण करणे हेच शिक्षणाचे उद्दिष्ट होते. भारतातील ११ लाख शाळांमध्ये मूलभूत कौशल्येही प्राप्त न होता शिकणारी व गळून पडणारी मुले एकीकडे असताना नवोदय विद्यालयाच्या धर्तीवर ६००० नवीन शाळा उघडण्याची घोषणा सरकारकडून केली जाते तेव्हा, मेकॉलेचीच नीती पुढे चालविली जात आहे असे दुर्दैवाने म्हणावे लागते. १९९१ च्या दशकात जी.डी.पी.च्या ४% रक्कम शिक्षणासाठी खर्च होत होती. २००५-०६ मध्ये ते प्रमाण ३.५% वर आलेले आहे. या पार्श्वभूमीवर, परिस्थितीत बदल करण्यासाठी म्हणजे आपल्या गावातील मुलांना दर्जेदार शिक्षणाचा हक्क बजावता यावा यासाठी ग्रामशिक्षण समितीच्या माध्यमातून प्रयत्न करणे महत्त्वाचे आहे.

महाराष्ट्राच्या विविध भागातील ज्या कार्यकर्त्यांना, संस्थांना ग्रामशिक्षण समिती सक्षमीकरणासाठी प्रयत्न करण्यात रस आहे त्यांना एकत्र येण्याचे आवाहन 'ग्रामशिक्षण समिती सक्षमीकरण अभियान' या प्रक्रियेअंतर्गत करण्यात आले. हेरंब कुलकर्णी, मुक्ता दाभोलकर आणि साधना ट्रस्टच्या वतीने विजयाताई चौहान यांनी या प्रक्रियेत पुढाकार घेतला. कोणतेही चांगले काम साधनांच्या अभावी अडत नाही (असे महात्मा गांधींचे एक सुप्रसिद्ध वाक्य आहे.) या भावनेतून, स्वयंसेवी वृत्तीने ग्रामशिक्षण समिती सक्षमीकरणाच्या या प्रक्रियेत सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले. त्याला चांगला प्रतिसाद मिळून, महाराष्ट्रातील १४ जिल्ह्यातील १६ स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी या प्रक्रियेत सहभागी झाले.

ही अनौपचारिक शिक्षण व ग्रामशिक्षण समिती सक्षमीकरण या क्षेत्रातील 'राज्य साधन केंद्र' आघाडीची प्रशिक्षण व संशोधन संस्था या स्वयंसेवी वृत्तीच्या प्रतिसादाने प्रभावित झाली. या संस्थेचे संचालक डॉ.कैलास नवले यांनी या प्रयत्नात प्रशिक्षणासाठी सर्वतोपरी मदत करण्यासाठी साधना ट्रस्टच्या जोडीने उभे राहण्याचे मान्य केले. गांधीजींच्या वाक्याने जागवलेला विश्वास खोटा ठरला नाही.

विदर्भ, मराठवाडा, कोकण अशा महाराष्ट्रातील वेगवेगळ्या भौगोलिक विभागातील शिक्षणविषयक चित्रातील साम्यस्थळ म्हणजे 'गुणवत्तेचा अभाव' व त्याविषयी ग्रामस्थ व पालक यांच्यात आढळणारा जाणीवेचा अभाव.

आज ग्रामीण भागातही शिक्षित मध्यमवर्ग सरकारी शाळांपासून पूर्णपणे दुरावलेला आहे. १९६६ सालीच कोठारी कमिशनने सर्वांसाठी समान शाळा असाव्यात असा मुद्दा मांडला होता. परंतु प्रत्यक्षात शिक्षणाच्या खाजगीकरणाला आणि व्यापारीकरणालाच पाठबळ देण्यात आले. त्यामुळे सरकारी शाळांतील शिक्षण दर्जेदार करण्यासाठीच्या प्रयत्नात शिकलेल्या, आपले म्हणणे ठामपणे मांडू शकणाऱ्या ग्रामस्थांचा सहभाग मिळत नाही. मध्यंतरी श्री.अनिल

सद्गोपाल यांच्या एका लेखात कॅनडातील १९९७ सालच्या प्राथमिक शिक्षकांच्या संपाचा संदर्भ वाचला. त्या संपाला, विद्यापीठातले विद्यार्थी, प्राध्यापक, विद्यार्थी संघटना, पालक गट इत्यादी सर्वांनी पाठिंबा दिला होता. संपाचा प्रभाव इतका जबरदस्त होता की सात दिवस त्या प्रांतातील सर्व व्यवहार थंडावले होते. प्राथमिक शिक्षणाच्या प्रश्नावर समाजातील सर्व घटक एवढ्या मोठ्या संख्येने रस्त्यावर उतरलेले बघून लेखकाला आश्चर्य वाटले. त्यांनी या घटनेचे विश्लेषण केले तेव्हा त्यांच्या लक्षात आले की पंतप्रधानांपासून शेतमजुरांपर्यंत सर्वांची मुले तेथे सरकारी शाळेत शिकतात. आपल्या घराशेजारी असलेल्या शाळेतच प्रत्येकाला जावे लागते. त्यामुळे सर्व समाजाचे हितसंबंध या प्राथमिक शाळांशी निगडीत प्रश्नांमध्ये गुंतलेले आहेत. ते सोडविण्यासाठी शिक्षित, अल्पशिक्षित, गरीब, श्रीमंत, सर्वांनी एकत्र येणे स्वाभाविक आहे.

आज आपण कोठेही ग्रामशिक्षण समिती सदस्यांशी संवाद साधताना जर त्यांना विचारले की तुमच्या गावातील शिक्षणाशी संबंधित एक समस्या सांगा, तर लोक भौतिक समस्यांविषयी बोलतात. नुकताच परत एकदा याचा प्रत्यय आला. ग्रामशिक्षण समिती सक्षमीकरणाच्या प्रक्रियेत सहभागी असलेले डॉ.पी.व्ही.मंडलिक ट्रस्टचे एक कार्यकर्ते श्री.हरिहर वाटवे यांनी सिंधुदुर्ग जिल्ह्यातील सावंतवाडी तालुक्यात ग्रामशिक्षण समिती सदस्यांचा एक मेळावा (पंचायत समितीच्या सहकार्याने) आयोजित केला होता. या मेळाव्यासाठी तालुक्यातील ६३ गावांपैकी २९ गावांतील १२० ग्रामशिक्षण समिती सदस्य उपस्थित होते. सिंधुदुर्ग जिल्ह्यात शाळांच्या भौतिक सुविधांची पूर्तता करण्याविषयी गावे तत्पर आहेत. भौतिक साधनांसाठी लोकसहभागातून करावयाच्या शैक्षणिक उठावाचे उद्दिष्ट तेथे १०० टक्के पेक्षा अधिक प्रमाणात पूर्ण झालेले असते. गेल्या काही वर्षांत सर्वशिक्षा अभियानाच्या माध्यमातून भौतिक सुविधांची पूर्तता मोठ्या प्रमाणात झालेली आहे. तरीही 'शिक्षणाशी संबंधित प्रश्न मांडा' असे म्हटल्यावर भौतिक सुविधा, शिक्षकांची शिक्षणबाह्य कामे याविषयीच सदस्य बोलले. ही कोंडी फुटून शिक्षणाचा दर्जा, शिक्षणाचा हेतू हे विषय ग्रामशिक्षण समितीच्या अजेंड्यावर आले पाहिजेत.

शिक्षणातील गळतीची अनेक कारणे आहेत. त्यापैकी मुलांना शाळा निरस वाटते हे एक महत्त्वाचे कारण आहे. हे कारण लक्षात घेऊन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामध्ये शिक्षणासंबंधी काही महत्त्वाची तत्त्वे नमूद करण्यात आली आहेत. दैनंदिन अध्ययन, अध्यापन हे बालकेंद्री, कृषीप्रधान, आनंददायी असावे अशी अपेक्षा त्यात व्यक्त केलेली आहे. या दृष्टिकोनावर आधारित शिक्षण प्रशिक्षणेही गेली काही वर्षे मोठ्या प्रमाणात होत आहेत. परंतु बहुतांश शाळांमध्ये शिकविण्याच्या पद्धतीत या दृष्टिकोनाचा अंतर्भाव घडून काही बदल झाल्याचे दिसत नाही. शाळेमध्ये या पद्धतींचा कधीही वापर होत नसल्याने पालकांना, ग्रामस्थांना या शिक्षणाविषयक दृष्टिकोनामुळे घडणाऱ्या बदलांचा प्रत्यय आलेला नाही.

मध्यंतरी तामिळनाडूमधील एक बातमी वृत्तपत्रात वाचली. तामिळनाडूमध्ये ग्रामशिक्षण समिती दिन साजरा केला जातो. शालेय शिक्षणाशी संबंधित सर्व घटक त्या दिवशी एका व्यासपीठावर येतात. यावर्षी या निमित्ताने घेण्यात आलेल्या कार्यक्रमात Learning methods ची पालकांना ओळख करून देण्यात आली. Activity based learning म्हणजे काय हे सांगितले. याचप्रमाणे पालकांना व ग्रामशिक्षण समिती सदस्यांना शिक्षणविषयक योग्य दृष्टिकोन देण्याचे काम केले पाहिजे. त्यामुळे ग्रामशिक्षण समितीच्या अजेंड्यामध्ये बदल होऊ शकेल. वर नमूद केलेल्या, सावंतवाडीच्या ग्रामशिक्षण समिती सदस्यांच्या मेळाव्यातील एक अनुभव यासंदर्भात नमूद करण्यासारखा आहे. 'स्वयंअध्ययन कार्ड' म्हणजे काय? 'गणित कोपरा', 'कला कोपरा' म्हणजे काय?' हे ग्रामशिक्षण समिती सदस्यांना माहीत आहे का अशी विचारणा केली असता एकाही ग्रामशिक्षण समिती सदस्याने हे शब्ददेखील ऐकलेले नव्हते हे लक्षात आले. 'शिक्षण अर्थपूर्ण होण्यासाठी कोणते उपक्रम राबविले पाहिजेत?', 'अनौपचारिकरित्या मुलांची गुणवत्ता कशी तपासली पाहिजे?', 'शाळा-भेटीत ग्रामशिक्षण समिती सदस्यांनी कोणते प्रश्न विचारले पाहिजेत?' असे विषय घेऊन ग्रामशिक्षण समितीपर्यंत पोहोचले पाहिजे.

शालेय शिक्षणासाठीच्या तासिकांपैकी ५०% वेळ हा अनौपचारिक शिक्षणासाठी राखलेला असतो. प्रत्यक्षात कला, कार्यानुभव, शारीरिक शिक्षण हे विषय फक्त वेळापत्रकात नमूद केलेले आढळतात. शिक्षण अर्थपूर्ण होण्यासाठी, मेंदूच्या विकासासाठी या विषयांचे असलेले महत्त्व आपल्या समाजाने अजून लक्षात घेतलेले नाही. त्यामुळे या संदर्भात समाजाच्या शाळेकडून काही अपेक्षाही नाहीत. वर्गातील ३०-४० मुलांना हे विषय शिकविणे शिक्षकांना अनेकदा कठीण वाटते. ही अडचण सोडविण्यासाठी गावसमाज शाळेला मदत करू शकेल. यातून शिक्षण अधिक जीवनलक्ष्यी बनेल व या माध्यमातून गाव व शाळा यांचा संबंध अधिक दृढ होईल. प्राथमिक शाळांमधील अनौपचारिक शिक्षणाची हेळसांड होण्याचा हा विषय ग्रामशिक्षण समितीमार्फत पोहोचविला पाहिजे. हा असा विषय आहे की अल्पशिक्षित ग्रामस्थही यासाठी मोठे योगदान देऊ शकतील.

शालेय शिक्षणाबरोबरच पूर्व प्राथमिक शिक्षण, अनौपचारिक शिक्षण, निरंतर व प्रौढ शिक्षण हेदेखील ग्रामशिक्षण समितीचे कार्यक्षेत्र आहे. परंतु आज या संदर्भात कोणत्याही शासकीय यंत्रणा गावात सातत्याने कार्यरत नाहीत. पूर्वप्राथमिक शिक्षणाचे काम अंगणवाडीमार्फत केले जाते, पण एकात्मिक बालविकास योजनेतील अनेक कामांपैकी ते एक काम आहे. या पार्श्वभूमीवर दर्जेदार प्राथमिक शिक्षणासाठी प्रयत्न करणे हे ग्रामशिक्षण समितीच्या अजेंड्यावरील प्राधान्याचे काम आहे.

दर्जेदार शिक्षणाप्रती राजकीय व्यवस्था संवेदनाहीन आहे, प्रशासन सुस्त आहे. या सामाजिक वास्तवाला, लोक त्यांचे (लोकशाही विकेंद्रीकरणातून प्राप्त झालेले) अधिकार वापरून स्वत:च्या आयुष्यात बदल घडवून आणतील या आशेचीच रूपेरी कडा आहे.

muktadabholkar@gmail.com

फारूक
काझी

# भाषा आणि गणित या विषयांचे अध्यापन

**सोलापूर जिल्ह्यातील सांगोला येथे, सांगोला व मंगळवेढा तालुक्यातील १२ प्राथमिक शाळांतील ३१ प्राथमिक शिक्षकांना एकत्र आणून भाषा व गणित या विषयांच्या अध्यापनाविषयी दोन दिवसांची कार्यशाळा आयोजित केली होती. त्या कार्यशाळेच्या संयोजकांपैकी एक असलेल्या फारूक काझी या तरुण प्राथमिक शिक्षकाने पाठवलेले हे चर्चा-मंथन...**

खाजगी शाळांची संख्या वाढू लागली, कारण रूढीबद्ध, चौकटबंद शिक्षण देणाऱ्या शाळा अशी सरकारी शाळांची ओळख बनते आहे. सरकारी शाळांनी बदलण्याची गरज आहे, हे सांगणं अथवा लिहिणं खूप सोप्पं आहे, मात्र प्रत्यक्षात हे कठीण आहे. एवढ्या मोठ्या व्यवस्थेत हे थोडं अशक्यच वाटतं. सरकारी तंत्रांनी सर्व कामं राबवली जातात, त्यामुळे सरकारी शाळांच्या सर्जनशीलतेला गंज चढतो. नवीन काही घडण्याचं प्रमाण कमी होत जातं.

या चौकटीत राहूनही काहीजण नवनव्या अनवट वाटा शोधत आहेत. पण अशा शिक्षकांचे प्रयत्न इतरांपर्यंत पोचत नाहीत, प्रसारमाध्यमंही याबाबत थोडी निराशावादीच आहेत आणि शिक्षकांच्या नावाने नेहमीच ओरड करणारे लोक ठोस उपाय सुचवत नाहीत.

अक्षरनंदन, गरवारे बालभवन, कमला निमकर, बालभवन अशा काही प्रयोगशील संस्था-शाळांना भेटी दिल्यावर तिथल्या रससरत्या अध्ययन-अध्यापनामागचं गमक जाणून घेण्याचा प्रयत्न केला. तेव्हा प्रकर्षाने जाणवलं की वर्षभर होणाऱ्या विविध प्रकारच्या कार्यशाळा-कृतीसत्रं ही या कृतिशीलतेमागील एक महत्त्वाची प्रेरणा आहे. खाजगी शाळांतून हे सहज शक्य आहे. परंतु सरकारी शाळांचा विचार करता हे थोडं कठीणच काम! एखाद्यानं धाडस करायचं ठरवलं तरी अनेक अडचणी. कारण या कामी बदलावी लागते ती शिक्षकांची मानसिकता.

प्रशासनाचा फारसा सहभाग न घेता असं काही आपल्याला करता येईल का? कोण मदत करेल? असे प्रश्न मनात येत, परंतु महाराष्ट्रातील शिक्षणपद्धतीवर स्वत:चा स्वतंत्र ठसा उमटवलेल्या कोल्हापूरच्या प्राचार्य लीलाताई पाटील यांच्या पत्राने आशेचा किरण दाखवला. त्यांच्याच प्रेरणेने २ व ३ फेब्रुवारी २००८ रोजी सांगोला, जि.सोलापूर इथे सरकारी शाळांतील शिक्षक (जि.प.च्या शाळा) आणि उत्कर्ष प्रशाला, सांगोला येथील शिक्षकवर्ग यांची दोन दिवसांची कार्यशाळा घेण्यात आली. प्राचार्य लीलाताईंनी भाषा विषयाचे आणि सृजन-आनंद विद्यालय, कोल्हापूर येथे गणित विषयाचं अध्यापन करणाऱ्या अरुणाताई आपटे यांनी गणित विषयासाठी मार्गदर्शन केलं.

संगमनेरचे श्री.संजय मालपाणी यांच्या विशेष पाठबळामुळेच हे शक्य होऊ शकलं. ही कार्यशाळा म्हणजे पुढील अध्ययन-अध्यापनाला मार्गदर्शक ठरेल असं टॉनिकच होतं.

**कार्यशाळा आयोजनाचा हेतू**

१. उपक्रमशीलता म्हणजे नेमकं काय या प्रश्नाला अनुसरून उपक्रमशीलतेची जवळून ओळख व्हावी.
२. आपण शिकवतो म्हणजे नेमकं काय करतो? या प्रश्नाच्या मदतीने स्वत:चं अवलोकन करण्याची संधी मिळावी.
३. आपल्या अध्यापनातील अडचणी, समस्या इत्यादींविषयी उपाय शोधायला शिकणे.
४. शिक्षकांतील उर्मी जागवण्याचा प्रयत्न करणे.
५. विशिष्ट घटक कसा शिकवावा हे न सांगता अध्यापनाची शैली आत्मसात करायला शिकणे.
६. खाजगी प्राथमिक शाळा- सरकारी प्राथमिक शाळा यांच्यात संवादाच्या देवाण-घेवाणीचा एक साकव तयार व्हावा.
७. धडपडणाऱ्या उपक्रमशील शिक्षकांना एकत्र आणून त्यांचे विचार-उपक्रम- कृती यांचं आदान-प्रदान घडवून आणावं.
८. वाड्यावस्त्यांवरील शाळांपर्यंत नवनवीन प्रयोग पोचावेत.
९. चांगल्या शिक्षकांना एकत्र आणून त्यांचा एक गट कार्यरत करणे.
१०.शिक्षकांच्या कल्पकतेला पुरेपूर वाव देऊन त्यांना अनवट वाटा शोधण्यास प्रवृत्त करणे.

**लीलाताईंची भूमिका**

शिक्षकांमध्ये ऊर्मी जागवण्यासाठी काय करायला हवं, त्यासाठी कृतिसत्रांची गरज कशासाठी याविषयी स्वत: लीलाताईंची भूमिका महत्त्वाची ठरते.

प्रशिक्षणकाळात काही पुस्तकी व ठोकळेबाज विचार व कल्पना प्रशिक्षणार्थींच्या डोक्यात कोंबण्यावर भर असतो. उपक्रमशीलता, सृजनशीलता, प्रायोगिकता, कल्पकता, स्वतंत्र विचारशक्ती यांच्यापेक्षा पुस्तकी ज्ञान व ठरीव चाकोरीतून अध्यापनाचा सराव यांनाच अधिक महत्त्व दिलं जातं. एखादा नवा विषय कसा शिकवावा हे प्रशिक्षणकाळात माहीत होत नाही. शिक्षक व क्रमिक पुस्तकं यांच्याशिवाय विषय शिकता येतात याचा अनुभव प्रशिक्षणकाळात मिळाल्यास नवीन विषय समजून घेण्याच्या पद्धती शाळेतील विद्यार्थ्यांपर्यंत शिक्षक पोचवू शकतील.

**कार्यशाळा वृत्तांत**

जि.प.च्या प्राथमिक शाळांतून अध्यापन करणारे शिक्षक आणि

उत्कर्ष प्रशाला, सांगोला यांच्या संयुक्त विद्यमाने ही कार्यशाळा पार पडली.

प्रार्थना, प्रार्थनेचा अर्थ व संजय मालपाणी यांच्या मनोगताने कार्यशाळेला सुरुवात झाली. लीलाताईंनी चौथीच्या वर्गावर पाठ्यपुस्तकाबाहेरचा 'स्वरचिन्हे', भाषिक खेळ, अटी घालून भाषिक खेळ घेणे इत्यादी भागावरील पाठ घेतला. पाठाच्या शेवटी एका उत्सुकता वाढवणाऱ्या कवितेने मुलांना विचार करायला आणि बोलतं व्हायला भाग पाडलं. शिक्षकांच्या प्रतिक्रियाही विचारात घेण्यात आल्या.

**पाठावरील शिक्षकांच्या बोलक्या प्रतिक्रिया**

० शिकवलं जातंय हा भाव अजिबात नव्हता. सहज संवादातून पाठ उलगडत केला.

० मुलांशी भावनिक जवळीकता साधणं विशेष वाटलं.

० घोकंपट्टी कुठंही नव्हती- प्रत्यक्ष अनुभव, काय सुंदर कल्पना आहे.

० अप्रगत मुलांसाठी या पाठात कुठं जागाच नव्हती.

० मुलांचा सहभाग थक्क करणाराच होता. परिचय नसताना मुलं बिनधास्त बोलत होती.

० पुस्तकाविना शिकवता येतं? पहिल्यांदा अनुभवलंय. विलक्षण आहे हे.

**मुलांना वाचतं कसं करायचं?**

कृतिसत्रातील भाषा विषयाच्या अंतर्गत हा महत्त्वाचा विषय होता. मुलांना वाचन शिकवणं हे आपलं काम असं आपण समजतो, मात्र आपण केवळ वाचायला शिकवतो त्याचा संस्कार मुलांवर करीत नाही.

याचाच अर्थ आपल्याला वाचनाचा आनंद लुटताच येत नाही. वाचन हे केवळ शाळा-परीक्षा यांच्या चक्रातच अडकून पडलंय. ते जीवनाला भिडतच नाही. त्यामुळे ते आपलंसं वाटत नाही.

मुलांना वाचतं करण्यासाठी लीलाताईंनी काही मुद्दे मांडले. संदर्भ म्हणून लीलाताईंचे काही लेखही अभ्यासायला मिळाले.

अक्षरं, स्वरचिन्हं, शब्द आणि वाक्य यांच्या रूपाने आजूबाजूला दिसणारं ऐकू येणारं, चाखायला मिळणारं, जेव्हा मुलांच्या शिक्षणात प्रवेश करतं तेव्हा मुलाला ते शिकावंसं वाटतं. त्यातूनच वाचनाचं वेड लागतं.

शिक्षकांनी स्वत: वाचनाचे पाठ मुलांना द्यायला हवेत. त्यातूनच मुलं वाचन करायला शिकतील, रटाळ वाचनामुळे वाचनातला प्राणच हरवून जातो.

एका दृष्टिक्षेपात जास्तीत जास्त शब्द पकडण्याची खुबी मुलाला साधली की ते 'वाचतं' होतं. वाचायला शिकवण्याचा हेतू अमूक एक पुस्तक मुलाला वाचता येणं आणि त्यातील प्रश्नांची उत्तरं मुलाला सांगता येणं हा नसून त्याला 'वाचतं' करून 'वाचवणं' हा आहे.

मुलं जे वाचतात त्याचा स्वत: अर्थ लावण्याचा प्रयत्न करतात. अर्थ लागेपर्यंत परत परत वाचतात. फक्त त्यांना त्यासाठी योग्य तेवढा वेळ दिला पाहिजे.

लीलाताईंनी स्वत: शिक्षकांच्या वाचनाचे प्रात्यक्षिक घेतले. मुलांना वाचतं करण्याआधी शिक्षक स्वत: 'वाचता' झाला पाहिजे. त्यासाठी लीलाताईंनी सोबत आणलेली पुस्तकं शिक्षकांना वाचनासाठी म्हणून ठेवली.

**मुलांना लिहितं कसं करायचं?**

मुलांना 'वाचतं' करण्याबरोबरच त्यांना 'लिहितं' करण्यावरही लीलाताईंनी तितकाच भर दिला. मुलं आणि लेखन याविषयावर 'लिहिणं मुलांचं शिकवणं शिक्षकांचं' या पुस्तकात लीलाताईंनी सखोल चर्चा केली आहे.

शाळेतील मुलं लिहायचा कंटाळा करतात याची कारणे कोणती असू शकतात... १. आपल्याला सहजतेनं ८-१० ओळी लिहिता येतील असा आत्मविश्वास मुलांनी मिळवलेला नसतो. २. शिक्षकांचे तांबडे फराटे आणि चुकलेले शब्द दहा वेळा लिहिण्याची शिक्षा याच्या भीतीपायी मुलं लिहायचं टाळतात तरी किंवा कमीत कमी लिहितात. ३. त्यांची शब्दसंपत्ती कमी असते, ४. लिहायचा विषय त्यांच्या मनाला भिडलेला नसतो.

मुलांना मनात येणारे विचार, भावना आणि कल्पना बोलून अथवा लिहून सांगायला त्यांना अवघड जाऊ नये, आत्मविश्वासाने सहजतेने त्यांनी बोलावं, लिहावं एवढंच नव्हे तर 'लिहिणं' म्हणजे स्वत:चं 'असणं' असं त्यांना कुठेतरी जाणवावं.

दिसण्याचं पाहण्यात, पाहण्याचं समजण्यात, समजण्याचं शिकण्यात आणि शिकण्याचं कृतीत रूपांतर होण्यासाठी आपण शिकायला हवं.

मुलं लिहिती रहावीत यासाठी मराठीच्या शिक्षकाने स्वत:च्या अंगावर कोसळणारे अनेक जीवनानुभव झेलून त्यातलं नेमकं काय आपल्या मुलांच्या भाषाविकासासाठी उपयोगी पडू शकेल याचा विचार करायला हवा. प्राथमिक स्तरावर मुलांना भाषेचा लळा लागावा आणि येणारे अनुभव आतपर्यंत शोषून घेऊन लिहिण्यावाटे मांडण्याची आवड निर्माण झाली की मुलं लिहिती राहतात.

मुलांना वाचतं करण्यासाठी जसं शिक्षकांनी वाचतं व्हायला हवं, तसंच मुलांना लिहितं करण्यासाठी शिक्षकांनी स्वत: लिहितं व्हायला हवं. त्यासाठी लीलाताईंनी शिक्षकांना दोन विषय लिखाणासाठी दिले. १. टेबल, २. मी एक कागदाचा कस्पट. शिक्षकांचं लेखन-वाचन यावर मिश्किल अशा प्रतिक्रिया देत लीलाताईंनी शिक्षकांनाही लिहितं केलं. टेबल व कागदाच्या कस्पटावर वेगवेगळ्या पद्धतीने लेखन करता येऊ शकतं याचा तो वस्तुपाठच होता.

वाचलेल्या पुस्तकांची टिपणे, प्रसंग वर्णने, कल्पनाशक्तीला चालना देणारे निबंध, विषय, कविता, संवाद, नाटकं, एकांकिका इत्यादी लिखाणाचे अनुभव मुलांना द्यायला हवेत. सृजन-आनंद विद्यालयामधील विद्यार्थी आयती नाटकं बसवत नाहीत. ती मुलं स्वत: नाटकं लिहितात, रचतात व करून दाखवतात. हा अनुभव

सांगताना लीलाताई भारावलेल्या आवाजात बोलायला लागतात. हा अनुभव इतरत्रही येऊ शकतो. मात्र त्यासाठी शिक्षकांनी मुलांशी एकरूप व्हायला हवं. त्यांच्या अनुभवांनाही प्रेमाने 'शेअर' करायला हवं.

लीलाताईनी मुलांना लेखनासाठी काही आगळे-वेगळे विषय सुचवले होते.

१. झोपण्याच्या तऱ्हा, २. मोठी माणसं खोटं बोलतात, ३. सवयी, ४. चेंडू माझा मित्र, ५. खिडकी, ६. कचऱ्याच्या तक्रारी, ७. आभाळ माझ्याशी बोलतंय, ८. तक्रारीच तक्रारी, ९. बागेतील गंमती, १०. केस पिकायला लागले.

लेखनाची पूर्वतयारी घेताना दिलेल्या विषयावर मुलांची चर्चा घडवून आणायला हवी. त्यातून लेखनासाठीची दिशा निश्चित होते. मुलांचे अनुभव त्यात व्यक्त व्हायला हवेत आणि सहजसोप्या वाक्यात त्यांना लेखन करू द्यावं. मोठ्यांनी आपली मोठी वाक्ये त्यांच्यावर थोपवू नयेत.

### शिकणं आणि शिकवणं

**शिकणं–** जाणून घेणं, फुलणं, उमलणं, अनुभवणं, उपसणं, बदलणं, प्रश्न पडणे, तुलना करणे, समजणे, पारखणे इत्यादी...

**शिकवणं म्हणजे–** नष्ट करणे, तुलना करणे, विचार करणे, सौंदर्याची ओळख करून देणं, कुतूहलपूर्ती करणे, आत्मविश्वास देणे, स्वत: विकसित होणं, स्वत:च्या व विद्यार्थ्यांच्या कृतीची अर्थपूर्णता पारखणं.

### गणित किती मजेचं

कार्यशाळेच्या दुसऱ्या दिवशी सृजन-आनंद विद्यालयात गणित विषयाचं अध्यापन करणाऱ्या अरुणाताईंनी गणित विषयातली मजा अनुभवायला लावणारे काही खेळ घेतले. संख्याज्ञान ते गुणाकार-भागाकारापर्यंतचा प्रवास इतक्या सहजपणे व कमीत कमी वेळात घेतला. गणितातील काही मूलभूत संकल्पनांविषयीही त्यांनी मार्गदर्शन केले.

वर्गातील कॅलेंडर हे केवळ तारखा, वार, सण इत्यादी पाहण्यासाठीच आपण वापरतो, परंतु अरुणाताईंनी कॅलेंडर हे एकच साधन वापरून नानाविध खेळ घेतले.

१. सम-विषम संख्या, २. मूळ-संयुक्त संख्या, ३. एक अंकी-दोन अंकी संख्या. ४. चढता-उतरता क्रम. ५. रेषेखालील-वरील संख्या, ६. दुप्पट-तिप्पट संख्या, ७. पाढे, ८. विभाज्य संख्या, ९. आधी-नंतर येणाऱ्या संख्या. १०. वर्ग-वर्गमूळ इत्यादी प्रकारच्या गणिती संकल्पना आनंददायी पद्धतीने, त्याही सहज उपलब्ध होणाऱ्या साधनांद्वारे समजावून देण्याविषयीचा अरुणाताईंनी वस्तूपाठच दिला. या खेळांचा शिक्षकांनीही मनसोक्त आनंद लुटला.

### कृतिसत्रावरील शिक्षकांच्या प्रतिक्रिया

- कार्यशाळा, कृतिसत्र म्हणजे नेमकं काय? हे पहिल्यांदा समजलं. कारण प्रशिक्षणामधून आमच्या शंकांचे निरसन कधी होतच नाही.
- आजवर काही प्रश्न मनात घर करून होते, या दोन दिवसांत त्यातल्या बऱ्याच प्रश्नांची उत्तरे मिळाली.
- भाषाविषय कसा शिकवावा याविषयी आम्ही कधी गांभीर्याने विचार केला नव्हता आणि ते कधी कुणी शिकवलंच नाही. आम्ही भाषा विषय शिकवताना किती भयंकर चुका करत होतो याची आज जाणीव होतेय.
- गणिताच्या काही संकल्पना आम्हाला ठाऊक नव्हत्या, मुलांना कशा समजावणार? गणिताचा या कृतिसत्रातला भाग खूप काही शिकवून गेला.
- कॅलेंडर आजवर वर्गातली शोभेची वस्तू होतं, परंतु आज खेळताना जाणवलं की गणिताचा बराचसा भाग कॅलेंडरवरच घेता येतोय. आता कॅलेंडर भिंतीवर नाही लावणार, त्याची जागा मुलांतच.
- अचानक विषय दिल्यावर लिहिणं जमेल की नाही असं वाटत होतं, पण जमलं. वाचनाविषयीही तसंच. सरावाने मला आणि मुलांना जमेल असं वाटू लागलंय.
- मुलांना शिक्षा करू नका. काय अधिकार आहे आपल्याला? या लीलाताईंच्या वाक्यांनी मनाचा ठावच घेतलाय. पुन्हा अशी चूक होणार नाही.
- अप्रगत मुलांसाठी (गतिमंद) काही करता येईल का? या प्रश्नाचं उत्तर मिळालं असतं तर अधिक आनंद वाटला असता.

### कार्यशाळेनंतर लीलाताईंनी व्यक्त केलेल्या अपेक्षा

शिक्षकांचं भारावलेपण दोन दिवसांचं नको. त्यांनी आता नव्याने कामाला लागायला हवं. अनवट वाटा शोधायला हव्यात.

मुलं वाईट नसतातच, आपणही वाईट नसतो. फक्त समजून घेणं कमी पडतं. समजून घ्यायला शिकायला हवं. मुलांत विश्वास निर्माण होईल हे पहा. त्यांच्या पंखांना बळकटी द्या.

मुलांना आयती उत्तरं देण्यापेक्षा प्रश्न शोधायला शिकवा. कौशल्यांना (स्वत:च्या व मुलांच्याही) खतपाणी घाला.

शिकणं म्हणजे उमलणं आहे हे विसरू नका.

### हेरंब कुलकर्णी–

सदर कृतिसत्रासाठी हेरंब कुलकर्णी उपस्थित होते; त्यांनीही काही अपेक्षा व्यक्त केल्या.

- आपल्या उपक्रमांच्या नोंदी ठेवा.
- संशोधनात सहभागी व्हा.
- अशा प्रकारच्या धडपडणाऱ्या शिक्षकांची टीम प्रत्येक ठिकाणी कार्यरत व्हायला हवी. वाड्यावस्त्यांपर्यंत हे उपक्रम पोचायला हवेत.

शिक्षकांनी नवनवीन प्रयोगांचा स्वीकार करायला हवा.

**फारूक एस. काझी**
नाझरा, ता.सांगोला, जि. सोलापूर ४१३३०८
भ्रमणध्वनी : 9921380966

**कुमार साधना**

## गणित म्हणजे काय रे काका : ७

# सातत्याचं मूल्यांकन

**डॉ. प्रकाश जोशी**

‘‘रोहन, तुझ्या अभ्यासाच्या वेळापत्रकात सातत्य नाही असं मी म्हटलं याचा अर्थ काय?’’ काका.

‘‘तो तूच सांगायचास.’’

‘‘तुझ्या सरासरी अभ्यास वेळेपेक्षा तू वर्षातले काही दिवस फार जास्त अभ्यास करतोस आणि काही दिवस फारच कमी. तुझ्या अभ्यासाच्या वेळात सरासरीपेक्षा फारशी तफावत नसती तर सातत्य आहे असं म्हटलं असतं. यावरूनच तू सातत्य गणितात कसं बसवायचं ते सांगू शकशील?’’

‘‘विचार करायला पाहिजे, परंतु तेवढा वेळ नाही. उद्या सकाळपर्यंत मला क्रिकेटचा काय तो निकाल लावायचाय.’’

‘‘सोप्पं तर आहे. तुझ्या धावांची वा अभ्यास वेळेची प्रत्येक संख्या सरासरी संख्येपासून किती दूर आहे ते...’’

‘‘हां आलं ध्यानात. ते काढायचं आणि मग त्यांची सरासरी.’’

रोहननं आपल्या सरासरी धावसंख्येतून प्रत्येक सामन्यातील धावसंख्या वजा केली आणि त्यांची बेरीज केली.

(२४-२२)+(२४-२७)+(२४-१९)+(२४-२२)+(२४-३०)=०.

‘‘समीरच्या धावांबाबतीतही असंच कर.’’ काका.

ते उत्तरदेखील शून्य आलं.

‘‘दोघांचीही सरासरी तफावत समान म्हणजे शून्य आहे. मग तुझ्या खेळात सातत्य आहे असं कसं म्हणतोस?’’

‘‘आमच्या धावसंख्या पाहून तूच सातत्याचं बोलला होतास.’’ रोहननं आठवण करून दिली.

‘‘बरोबरच आहे. तुझ्या खेळात सातत्य आहे. पण तू वापरलेली गणिती पद्धत चुकीची आहे. आपण सरासरी का काढतो? कारण सर्व किंमती सारख्या नसतात म्हणून. काही किंमती सरासरीहून कमी आणि काही त्याहून जास्त असतात. म्हणूनच त्या तफावतींची बेरीज तू केलीस तशी केली तर उत्तर शून्य येणार. यासाठी Absolute value ची म्हणजे शुद्ध अर्थात पॉझिटिव्ह किंमतीची संकल्पना कामी येते. गणितामध्ये ही किंमत ॥ अशा दोन उभ्या रेषांमध्ये दाखवली जाते. आपण नेहमी करतो त्या वजाबाकीत आणि शुद्ध तफावतीत फरक कसा असतो पहा...

२ - ५ = (२-५) = -३. परंतु । २-५ । = ३. =+ ३.

तेव्हा तुमच्या धावसंख्येच्या सातत्याचं मूल्यांकन करायचं झालं तर ते Absoute Mean Deviation म्हणजे AMD ने करता येईल. तुमच्या बाबतीत

$$AMD = \bar{\text{त}}\,\frac{\sum_{\text{ध}_{\text{ज}}=१}^{\text{ध}^{\text{ज}}=५} \left|\text{ध}_{\text{ज}} = \bar{\text{ध}}\right|}{\text{न}}$$

हे असलं सूत्र पाहून तू गणिताचा धसका घेतलास? कोणीही घेईल! हे सूत्र

$$\frac{|२४-२२|+|२४-२७|+|२४-१९|+|२४-२२|+|२४-३०|}{५}$$

या सरासरीचं संक्षिप्त करूप आहे. काही येतं का ध्यानात? ही तफावतींची सरासरी आहे.

असा गांगरून जाऊ नकोस. ही गणिती भाषा आहे. काकानं रोहनपुढं तामिळी भाषेतील मजकूर ठेवला आणि सांगितलं ‘वाच.’

रोहनला वाचता आलं नाही.

‘‘म्हणजे तू निरक्षर की रे.’’ काका उद्‌गारला.

काकाच्या या शेऱ्यानं रोहन चिडला.

‘‘मी चांगला साक्षर आहे. मराठी किंवा इंग्लिश मजकूर दे. बघ वाचतो की नाही?’’

‘‘परंतु तामिळी बाबतीत तू निरक्षरच. जशी देवनागरी, तामिळी ह्या लिपी असतात, तशीच गणिताची लिपी आहे. ती समजली की झालास साक्षर. आता पायरी पायरीनं आपण या सूत्राची उकल करू.

१. इथं त तफावतीसाठी तर ध हे अक्षर धावसंख्येसाठी वापरलेलं आहे. ज म्हणजे सामना क्रमांक. एकूण किती सामने खेळले गेले ते न अक्षर दर्शवतं. तेव्हा इथं न = ५.
२. ध अक्षराखाली बारीक अक्षरात ज लिहिलंय तेव्हा $\text{ध}_{\text{ज}}$ म्हणजे ज क्रमांकाच्या सामन्याची धावसंख्या. तुझ्या बाबतीत $\text{ध}_{१}$=२२, $\text{ध}_{२}$ = २७, $\text{ध}_{३}$ = १९, $\text{ध}_{४}$ = २२ आणि $\text{ध}_{५}$ = ३०. आता...
३. सूत्रात त आणि ध ह्या अक्षरांवर आडवी रेघ मारली आहे. बदलती किंमत त्या खाली लिहिलेल्या क्रमांकानं दाखवली जाते. जसं $\text{ध}_{\text{ज}}$ , तर सरासरी किंमत अक्षरावर अशी $\bar{\text{ध}}$ रेघ मारून दाखवली जाते. आता महत्त्वाचं.
४. $\Sigma$ हे चिन्ह. हे चिन्ह बेरजेसाठी वापरलं जातं. कोणत्या संख्यांची बेरीज ते या चिन्हाच्या खाली आणि वर लिहिलं जातं. आपण खाली लिहिलंय ज = १ आणि वर ज = ५. याचा अर्थ सामना क्रमांक १ ते सामना क्रमांक ५ च्या धावसंख्येच्या सरासरी पासूनच्या शुद्ध तफावतींची बेरीज ह्या चिन्हामुळं

। २४-२२ ।+ ।२४-२७। + ।२४-१९ ।+ ।२४-२२ ।+ ।२४-३०।

ही बेरीज...

$$\sum_{\text{ज}=१}^{\text{ज}=५} \left|\text{ध}_{\text{ज}} - \bar{\text{ध}}\right|$$

एवढ्या संक्षिप्त रूपात लिहिता येते. संक्षिप्तपणा ही तर गणिती भाषेची खुबी आहे. समज आपणाला पाचीच्या पाची सामने

विचारात घ्यायचे नाहीत. फक्त सामना क्र. २ ते ४ एवढ्यांचाच विचार करायचाय तर $\Sigma$ या चिन्हाच्या खालती आणि वरती तू काय लिहिशील?

''चिन्हाच्या खाली लिहीन ज = २ आणि वर ज = ४.''

''गुड. किंवा खाली फक्त २ आणि वरती ४ म्हणजे $\Sigma^{४}_{२}$ असं लिहिलं तरी चालतं. कारण ज चा उल्लेख सूत्रात केलेलाच असतो. जेव्हा सर्वच्या सर्व संख्यांची बेरीज करायची असते तेव्हा केवळ $\Sigma$ चिन्ह लिहिलं तरी चालतं. म्हणजे

$| ध_{ज} - ध |$ च्या ऐवजी $\Sigma \, | ध_{ज} - ध |$. कारण

संक्षिप्तपणा. आता तू तुझ्या आणि समीरच्या धावांचं AMD काढ. AMD हे तफावत दर्शवतं. तफावत म्हणजे सातत्याचा अभाव. तेव्हा AMD जेवढं कमी, तेवढं सातत्य जास्त.''

सूत्र वरवर अवघड दिसलं तरी गणित सोडवणं सोपं होतं. प्रथम प्रत्येक सामन्यातील शुद्ध तफावत काढली. त्यांची बेरीज केली. आलेल्या संख्येला ५ नी भागलं. झालं काही मिनिटांचं काम. रोहनचा AMD आलं ३.६ धावा तर समीरचं २८.४ धावा. खेळातलं रोहनचं सातत्य सिद्ध झालं होतं. उड्या मारून त्यानं तो आनंद साजरा केला.

पण एवढ्यावर थांबेल तो काका कसला? आता हे सूत्र...

Variance V = $\dfrac{\Sigma \, (ध_{ज} - ध)^{२}}{न-१}$.

''आता हे काय नवीन?'' रोहन.

''नवीन काही नाही. तेच परंतु वेगळ्या पद्धतीनं गणितात तफावत Variance अगर Standard Deviation (SD) नी दाखवण्याची पद्धत आहे.''

इथं तफावतींच्या वर्गांची बेरीज करायची आहे. तफावतींचे वर्ग घेण्याचं कारण पॉझिटिव्ह अथवा निगेटिव्ह कोणत्याही संस्थेचा वर्ग पॉझिटिव्हच असतो. शुद्ध तफावतीचा मुद्दा असा निकालात काढला. खालचा denominator (भाजक) AMD बाबतीत न आहे तर इथं तो न–१ आहे. असं का ते मी तुला नंतर सांगेन. आता दुसरी संज्ञा SD ती विशेष काही नाही ते Variance V चं वर्गमूळ असतं.

SD = $\sqrt{V}$

रोहननं त्याच्या आणि समीरच्या धावांचं SD काढलं. ते अनुक्रमे ४.४ धावा आणि ३८.१७ धावा एवढं आलं. रोहनचं सातत्य अधिक चांगलं असल्यामुळं त्याचं SD कमी असणं स्वाभाविक होतं.

''तुझ्या आणि समीरच्या सरासरी धावसंख्येत फारसा फरक नसल्यामुळं सातत्याचं हे मूल्यांकन ठीक आहे. तथापि गुणांक C0-efficient of Variation (CV) हेच सातत्याचं यथायोग्य मूल्यांकन करतं.''

''काका तू आणखी वाढवत बसू नकोस.''

''हे तर महत्त्वाचं आहे. समज माझ्या ५ सामन्यातील धावा आहेत ८२, ९६, १११, १०७ आणि ७९. तुझ्या ५ सामन्यातील धावांशी याची तुलना कर.''

रोहन गणित करू लागला. काकांची सरासरी आली ९५ धावा आणि SD १४.३७ धावा. काकाच्या धावा जास्त असल्या तरी आपलं SD बरंच कमी म्हणून सातत्यात आपणच सरस.

''इथंच चुकतंय. तुझं SD कमी आहे, परंतु माझ्या धावांची सरासरी तुझ्यापेक्षा कितीतरी सरस आहे. तेव्हा सातत्याची तुलना अशी करता येणार नाही. ती सरासरीच्या तुलनेनं म्हणजे CV नं करावी लागेल. CV चं सूत्र म्हणजे एकदम बच्चोंका खेल है.

इथं Mean म्हणजे धावांची सरासरी.

काकाचा CV ०.१५ आला. रोहनचा ०.१८३ आणि समीरचा १.५३.

''CV टक्केवारीतही देण्याची पद्धत आहे. आलेल्या उत्तराला १०० नी गुणलं की टक्केवारी मिळते. म्हणून माझा CV १५%, तुझा १८.३% आणि समीरचा १५३%. तुलनात्मक अभ्यासात हे असं करावं लागतं. राष्ट्रीय उत्पन्नाच्या बाबतीत एकूण उत्पन्न वास्तव उभं करू शकत नाही. एकूण उत्पन्नाला लोकसंख्येनं भागून दरडोई उत्पन्न काढलं जातं. लोकसंख्येच्या अभ्यासात एकूण लोकसंख्येऐवजी लोकसंख्या घनता म्हणजे प्रती चौरस कि.मी.ची सरासरी लोकसंख्या दिली जाते. याला Standardization किंवा Normalization म्हणतात.

हे सगळं सोपं आहे, तुला समजून घ्यायची आहे ती गणिती भाषा...

**डॉ. प्रकाश जोशी**
१०, विक्रम को–ऑप. हौसिंग सोसायटी,
टिळकनगर, जिजामाता रोड, ठाणे ४००६०३
फोन : (022) 25326690

**प्रिय वाचकहो,**
आतापर्यंत मुलांसाठी असलेले सर्व लेखन 'बालसाधना' या शीर्षकाखाली प्रसिद्ध होत होते. यापुढील काळात ८ ते ११ या वयोगटातील मुलांसाठीचे लेखन 'बालसाधना' तर १२ ते १५ या वयोगटातील मुलांसाठीचे लेखन 'कुमारसाधना' या शीर्षकाखाली प्रसिद्ध होईल. म्हणून 'गणित म्हणजे काय रे काका' या लेखमालेच्या शीर्षकातही 'बालसाधना' ऐवजी 'कुमारसाधना' असा बदल केला आहे.
**संपादक**

# शिक्षण हक्क जनजागरण यात्रा

अखिल भारतीय समाजवादी अध्यापक सभेच्या वतीने अध्यक्ष श्री. भाई वैद्य यांच्या नेतृत्वाखाली 'शिक्षण हक्क जनजागरण यात्रा' फुले वाडा, समता भूमी, पुणे येथून १७ सप्टेंबर २००८ रोजी सकाळी ८ वाजता निघत आहे. १६ सप्टेंबर रोजी सायंकाळी पुणे शहर व जिल्ह्याची जाहीर सभा एस.एम. जोशी सोशलिस्ट फाउंडेशनच्या सभागृहात होणार आहे. ही शिक्षण हक्क जनजागरण यात्रा महाराष्ट्रातील सर्व ३४ जिल्हा केंद्रांमध्ये जाऊन जनजागरण कार्यक्रमाचे आयोजन करणार आहे.

विषमताग्रस्त शिक्षणव्यवस्था बदलून सर्वांना समान व गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळावे या मागणीसाठी ही 'शिक्षण हक्क जनजागरण यात्रा' सुरू करण्यात येत आहे. या यात्रेचा समारोप २२ ऑक्टोबर २००८ रोजी चैत्यभूमी, मुंबई येथे होणार आहे. यात्रेमध्ये समाजवादी अध्यापक सभेचे प्रमुख पदाधिकारी तसेच एक पथनाट्य पथकही सहभागी होणार आहे.

यात्रा ज्या ठिकाणी जाईल त्या प्रत्येक शहरात सकाळी स्वागतानंतर पत्रकार परिषद, सायंकाळी जाहीर सभा, रात्री कार्यकर्ता मेळावा अशी योजना असेल.

या यात्रेद्वारे पालक, अध्यापक व मतदार विद्यार्थी यांना मोठ्या प्रमाणावर भेटावे, त्यांना आजच्या शैक्षणिक गोंधळाची परिस्थिती समजावून द्यावी आणि त्यावर उपाय म्हणून संपूर्ण शिक्षणाची आर्थिक जबाबदारी केंद्र व राज्य शासनांनी घेतली पाहिजे, अशी मागणी करावी अशी योजना आहे. 'बालवाडी ते उच्च शिक्षणापर्यंतचे संपूर्ण शिक्षण समान, गुणवत्तापूर्ण व फी-विना झाले पाहिजे' या भूमिकेचा उठाव सर्व जनतेतून घडवण्यासाठी ही यात्रा आहे. सामान्य जनतेने हा उठाव कसा घडवावा? ग्रामपंचायतींनी, शिक्षणसंस्थांनी, बचतगटांनी, छात्र संघटनांनी व कामगार युनियन्सनी असे ठराव करून सन्माननीय श्रीमती प्रतिभाताई पाटील, राष्ट्रपती, भारत यांच्याकडे रवाना करावेत, अशी आमची सूचना आहे. अशा ठरावांचा पाऊस कोसळला तर सरकारला आजचे शैक्षणिक धोरण बदलावेच लागेल असा आम्हांला विश्वास वाटतो. म्हणून शिक्षण हक्क जनजागरण यात्रेला सर्वांनी सहकार्य करावे, ही नम्र विनंती.

**– शिक्षण हक्क जनजागरण यात्रा समिती**

--------------

यात्रेची कार्यक्रमपत्रिका व अधिक तपशीलासाठी संपर्क –

**अखिल भारतीय समाजवादी अध्यापक सभा**

साने गुरुजी स्मारक, सिंहगड रस्ता, पुणे ४११०३०. दूरध्वनी : ०२०-२४३३१२४२, २४३३६११०.

एप्रिल-मे २००८ मध्ये 'साधना साप्ताहिका'ने आयोजित केलेल्या

# बालसाधना लेखनस्पर्धेचा निकाल

या स्पर्धेसाठी एकूण ४८ लेख (कथा, कविता, गोष्टी, कादंबरी इ.) आले होते.
त्यातील चार लेखांची निवड केली आहे. (क्रमांक दिलेले नाहीत.)

- 'त्याला परत कामावर घ्या' – **साईनाथ पाचारणे**, भोर, जि. पुणे.
- 'आम्हांला पण शिकायचं आहे' – **कमल राजाज्ञा**, कोथरुड, पुणे.
- 'शरदचा मामा' – **विवेक मुंबरकर**, कणकवली, जि. सिंधुदुर्ग
- 'प्रेरणा' – **पुष्पप्रभा बोकील**, कोथरुड, पुणे.

वरील चारही लेख, १८ ऑक्टोबर २००८ रोजी प्रसिद्ध होणाऱ्या
**'साधना बालकुमार विशेषांका'**त प्रसिद्ध होतील.
या लेखकांना अंकासोबतच मानधन पाठवले जाईल.

– संपादक 'साधना'

एन.डी.नं. आर.एन.आय.१६०१/५७
रजि.क्र. एल-२/आर.एन.पी./पी.एन.डब्ल्यू./डब्ल्यू/६८/२००६-२००८
तिकिटाशिवाय पाठवण्याचा परवाना नं. ७
पोस्टींग दर गुरुवारी मार्केट यार्ड पी.एस.ओ.सॉर्टींग ऑफिसमधून

**उद्योग आणि व्यापार : ४**

# गतकालाचे ज्ञान

*''उजव्या बाजूच्या व्यासपीठावरून अॅडॅम स्मिथ आपल्याशी अजूनही बोलत आहे, तर कार्ल मार्क्स डाव्या फळीत आपल्याला सामील करून घ्याला उत्सुक आहे. समाजवाद्यांच्या शब्दातून आपल्याला जॉन स्टुअर्ट मिलचा आवाज ओळखू येतो. उदारमतवादी भांडवलशाही सुधारकांच्या विधानातून आपल्याला जॉन मेनर्ड केन्सचे शब्द ऐकू येतात. रिकार्डोची विवेचक प्रतिभा, माल्थसचा निराशावादी सूर, जादा स्वप्नाळू असलेल्या यूटोपियन्स लोकांचा द्रष्टेपणा, व्हेब्लेनचा धूर्त शंकेखोरपणा – या सर्व गोष्टी तिथे आहेत.*

*या थोर अर्थशास्त्रज्ञांच्या शिकवणीपैकी बराचसा भाग आज लागू पडत नाही आणि तरीसुद्धा ती शिकवण संपूर्णपणे कुचकामी झाली आहे असे म्हणता येत नाही. या थोर अर्थशास्त्रज्ञांनी मानवाला जगाची एक जाण दिली आणि ती जाण आपल्या दैनंदिन तत्त्वज्ञानाचा भाग झाली आहे. जग हा एक असंबद्ध गोंधळ नसून, कशीही यदृच्छेने घडणारी नव्हे तर विकास पावणारी सुसंबद्ध रचना आहे, हे त्यांनी शिकवले. जेणेकरून आपला अधिक पुरा लाभ व्हावा असे आपल्या सभोवतीच्या परिस्थितीचे ज्ञान त्यांनी आपणास दिले. जी व्यवस्था आपल्याला पुढे भविष्यकाळात ढकलीत आहे ती आपणाला अधिक चांगली समजावी यासाठी त्यांनी आपल्याला गतकालाचे ज्ञान दिले.*

*आपण भविष्यकाळात जसे विकास पावू तशी आपल्याला त्यांची ही अंतदृष्टी उपयोगी पडणार आहे. आपल्या भवितव्याचे नियंत्रण करणे हे वाढत्या प्रमाणात आपल्यावरच येऊन पडणार असल्यामुळे, सध्याच्या सल्लागारांमधून आपल्याला निवड करावी लागेल – फार महत्त्वाची निवड करावी लागेल. त्यासाठी गतकालीन अर्थशास्त्रज्ञांचे शहाणपण आणि त्यांची झेप यांच्या साहाय्याने भवितव्याला सामोरे जाण्यासाठी लागणारे ज्ञान आपण पैदा केले पाहिजे.''*

**– रॉबर्ट एल्. हेलब्रॉनर**

(संदर्भ : 'अर्थशास्त्राचे शिल्पकार' – मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई.)

